म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय व्या.वा.
दा. क्र. १०५५
BVBK-0401755
BVBK-0401755

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. १७५५ दि. २८।२।८५
विषय [illegible] क्र. ........


वाचनालय वा
७७५५
२८।११।८५

रोज मुलांना एक गोष्ट सांगा.
३६० गोष्टी आणि १२ पुस्तकांचा संच.

# ज्येष्ठ

BVBK-0401755

पंढरीनाथ रेगे



अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७, नारायण पेठ, पुणे ३०

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७, नारायण पेठ,
दैनिक प्रभातसमोर, पुणे ३०.
फोन नं. ४४९५४१

© सर्व हक्क सुरक्षित

पहिली आवृत्ती :
२३ जानेवारी १९८५

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिन्टर्स,
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११ ०३०.

# राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
पंजाब सिंधु गुजरात मराठा
द्राविड उत्कल वंग ।
विंध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशिष मागे
गाए तव जयगाथा ।
जनगणमंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे

मुलांचे मनोरंजन आणि बौद्धिक वाढ होण्यासाठी या कथा लिहिल्या आहेत. या कामी भारतीय सांस्कृतिक कोष आणि इतर पौराणिक कथा यांचे अनेक वेळा सहाय्य लाभले. या सर्वांचा मी ऋणी आहे. त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

---

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) धन कशानं मिळतं ? | ५ | १८) माणुसकीचं दर्शन | ३३ |
| २) शहाला काटशह | ९ | १९) खोटा स्वयंपाकी | ३४ |
| ३) राजापूरची गंगा | ११ | २०) रुक्मिणीशी लग्न | ३५ |
| ४) दूरदर्शीपणा | १२ | २१) अग्निदेवता | ३५ |
| ५) ज्येष्ठाचा महिमा | १४ | २२) चाणाक्ष साक्षीदार | ३६ |
| ६) सांगकाम्या नोकर | १५ | २३) एकबुद्धी बेडूक | ३८ |
| ७) अती शहाणे | १७ | २४) चतुर तेन्नालीराम | ४० |
| ८) सत्यनिष्ठेचं चीज | १९ | २५) तिबेटी रामायण | ४२ |
| ९) योगिनी एकादशी | २१ | २६) निर्जला एकादशी | ४३ |
| १०) त्र्यंबकेश्वर | २२ | २७) बदरीनाथ | ४४ |
| ११) गारुड्याचे माकड | २३ | २८) वरुणदेवता | ४५ |
| १२) यमादेवी | २५ | २९) विदर्भाची पंढरी | ४६ |
| १३) घमेंडीचे फळ | २६ | ३०) राजा इन्द्र | ४६ |
| १४) कावळ्याचा बडेजाव | २७ | ३१) विज्ञानगणेश | ४७ |
| १५) नकारात होकार | २९ | ३२) मेघराज | ४७ |
| १६) भलत्याला उपदेश | ३० | ३३) बडा देव | ४८ |
| १७) सावित्रीची गोष्ट | ३१ | ३४) हाटकेश्वर | ४८ |

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. 9045 दि. 20/2/85
विषय बा.वा. क्र.

# १ धन कशानं मिळतं ?

एक अतिशय गरीब माणूस आपल्या बायकोसह राहात असे. दिवसभर मोलमजुरी करूनही त्याला दोघांचं पोट भरण्यापुरती मिळकत होत नसे. एके दिवशी तो वैतागून आपल्या बायकोला म्हणाला–

" काय गं, दिवसभर कष्ट करून सुद्धा आपल्यावर अर्धपोटी राहाण्याची पाळी येते. असंच चालू राहिलं, तर दिवसेंदिवस आपण अधिकाधिक दुबळे होऊन लौकरच मरून जाऊ. आपला शेजारचा तो जोसेफ मात्र फारशी मेहनत न करता सरकारी कचेरीत टेबलाशी बसून लिहिण्याचं थोडं फार काम करून भरपूर पैसे कमवतो. मजेत राहातो बेटा. खाण्यापिण्याची चंगळ. पोटभर तर काय, अजीर्ण होईपर्यंत खात असावा बेटा. म्हणून तर एवढा गलेलठ्ठ बनलाय अन् पोटपण सुटलंय त्याचं. म्हणजे कमी वेळ आरामशीर काम करून वर कमाई भरपूर. आहे की नाही बेट्याचं बलवत्तर नशीव ? त्याच्याकडं पाहून आपल्या एवढ्या काबाडकष्टांचं चीज होत नाही, म्हणून जास्त दुःख होतं."

यावर त्याची बायको म्हणाली,

" मी म्हणते, त्याला एवढी कमाई कशी होते हे त्यालाच का नाही विचारून घेत ? म्हणजे समजेल तरी त्याच्या कमाईचं इंगित. मग तुम्हाला पण तसे प्रयत्न करून जास्त कमाईचा मार्ग धरता येईल."

बायकोचं म्हणणं योग्य वाटलं अन् तो शेजारच्या जोसेफला भेटायला गेला. आपली कर्मकहाणी जोसेफला सांगून त्यानं विचारलं, " तुम्हाला मात्र थोडंसं काम करून भरपूर कमाई होते हे कसं काय ?"

जोसेफ त्याचं बोलणं ऐकून हसला आणि म्हणाला, ' अरे बाबा, शाळेत मास्तरांच्या हातून खूप मार खाल्ला मी. त्याचं फळ आहे हे

मुलांचे मनोरंजन आणि बौद्धिक वाढ होण्यासाठी या कथा लिहिल्या आहेत. या कामी भारतीय सांस्कृतिक कोष आणि इतर पौराणिक कथा यांचे अनेक वेळा सहाय्य लाभले. या सर्वांचा मी ऋणी आहे. त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

---

## अनुक्रमणिका


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | धन कशानं मिळतं ? | ५ | १८) | माणुसकीचं दर्शन | ३३ |
| २) | शहाला काटशह | ९ | १९) | खोटा स्वयंपाकी | ३४ |
| ३) | राजापूरची गंगा | ११ | २०) | रुक्मिणीशी लग्न | ३५ |
| ४) | दूरदर्शीपणा | १२ | २१) | अग्निदेवता | ३५ |
| ५) | ज्येष्ठाचा महिमा | १४ | २२) | चाणाक्ष साक्षीदार | ३६ |
| ६) | सांगकाम्या नोकर | १५ | २३) | एकबुद्धी बेडूक | ३८ |
| ७) | अती शहाणे | १७ | २४) | चतुर तेन्नालीराम | ४० |
| ८) | सत्यनिष्ठेचं चीज | १९ | २५) | तिबेटी रामायण | ४२ |
| ९) | योगिनी एकादशी | २१ | २६) | निर्जला एकादशी | ४३ |
| १०) | त्र्यंबकेश्वर | २२ | २७) | बदरीनाथ | ४४ |
| ११) | गारुड्याचे माकड | २३ | २८) | वरुणदेवता | ४५ |
| १२) | यमादेवी | २५ | २९) | विदर्भाची पंढरी | ४६ |
| १३) | घमेंडीचे फळ | २६ | ३०) | राजा इन्द्र | ४६ |
| १४) | कावळ्याचा बडेजाव | २७ | ३१) | विज्ञानगणेश | ४७ |
| १५) | नकारात होकार | २९ | ३२) | मेघराज | ४७ |
| १६) | भलत्याला उपदेश | ३० | ३३) | वडा देव | ४८ |
| १७) | सावित्रीची गोष्ट | ३१ | ३४) | हाटकेश्वर | ४८ |

तेव्हा मार खाल्ला; पण त्याची चांगली फळं आता चाखतोय मी." मार खाऊन झालं तरी शाळेत आपण विद्या शिकलो, मेहनत करून ज्ञान मिळवलं म्हणून आज आपण थोडक्या श्रमात एवढी कमाई करू शकतो, असा जोसेफच्या बोलण्याचा अर्थ होता. पण या दीडशहाण्याला तो नीट कळला नाही. केवळ मार खाल्ल्यानं धनलाभ होतो, अशी वेडगळ समजूत उराशी बाळगून स्वारी घरी परतली. लगेच आपल्या बायकोच्या हातात एक काठी देऊन तो तिला म्हणाला,

"या काठीनं मला भरपूर मारपीट कर बघू."

बायकोला याचा काही बोध होईना. हे काय विचित्र सांगणं, म्हणून ती त्याच्याकडं बघतच राहिली. पण स्वारी उतावीळ झाली होती. बायकोला ओरडून म्हणाली, "बघत काय राहिलीस अशी? मी सांगतो तसं कर. मीच सांगतोय ना मला मारायला? हं, चल, चालव काठी.'

तरी सुद्धा बायकोनं अडून विचारलं, "अहो पण...का?"

घायकुतीला आलेली स्वारी गडबडीनं बोलली, "कारण काय ते मागाहून सांगतो तुला. आधी मारझोड कर तर खरी!"

नवऱ्यानं मार खाण्याचा हट्टच धरलेला पाहून मात्र तिनं हातातली काठी सरसावली आणि त्याला यथेच्छ बदडून काढले.

थोडा वेळ मार खाऊन झाल्यावर त्याचं अंग चांगलंच तिंबून निघालं. आता जास्त मार खाल्ल्यास घायाळ होण्याची पाळी येईल, अशी भीती वाटून तो बायकोला म्हणाला–

"पुरे कर आता. खूप झाली एवढी मारपीट."

बायकोनं हात आवरता घेतला नि विचारलं– "हं! पोटभर खाल्ला ना मार? आता तरी सांगा पाहू मार खाण्याचं कारण."

"अगंऽऽऽ" मार खाल्ल्यामुळं जेरीस आलेले नवरोबा सांगू लागले, "पूर्वी खूप मार खाल्ला त्याचं फळ म्हणून चांगली कमाई हल्ली होतेय आपल्याला, असं सांगितलं जोसेफनं. म्हटलं... मार खाऊन धन लाभत असेल तर खाऊन घ्यावा मार. आता बघू या याचं फळ कधी कसं मिळतं ते!"

" हे म्हणजे भलतंच काहीतरी." बायको उद्गारली, " अशानं काय... "

" उगाच नसत्या शंका काढीत बसू नकोस, " नवरोबा बोलले. " आता पैका मिळाला म्हणजे कळेल तुला."

" बरं बाई !" बायको निरुपायानं उद्गारली, " माझं काय गेलं ? मार खावा लागला तुम्हालाच."

त्या दिवशी तो विषय तिथंच संपला. आता आपल्याला कुठून कसा पैसा मिळतो, याची वाट बघत स्वारी स्वस्थ बसली. नेहमीसारखं मोलमजुरीला न जाता तब्बल तीन दिवस स्वारी घरच्या घरी बसून राहिली. मारपिटीमुळं त्याचं अंगही ठणकून निघालं होतं: त्यामुळं दोन दिवस त्याला मजुरी करणंही कठीण होतं. पण तिसऱ्या दिवशीही पैसा मिळाला नाही, तेव्हा स्वारी चक्रावली. आणखी वाट पाहत घरी बसून राहायचं म्हणजे दोघांवरही उपासमारीची पाळी ओढवायची ! म्हणून चौथ्या दिवशी मजुरीच्या कामावर जाताना त्यानं जोसेफला पुन्हा गाठलं. जोसेफला तो म्हणाला,

" बायकोकडनं मारपीट करून घेतली, पण त्या गोष्टीला तीन दिवस होऊन गेले तरी अजून पैसा मिळण्याचं नाव नाही."

" म्हणजे ? मारपीट करून घेतली म्हणजे पैसा मिळतो ?" जोसेफनं नवल करीत विचारलं.

" तुम्हीच नाही का परवा म्हणालात, मास्तरांनी तुम्हाला मार दिला म्हणून आता चांगली कमाई होत आहे." त्यानं खुलासा केला.

" अस्सं होय ?" हसू अनावर होऊन हसत जोसेफ उद्गारला.

" किती मूर्ख, बेअक्कल आहेस रे तू ? माझ्या सांगण्याचा मतलब असा होता, की शाळेत जाऊन लिहायला, वाचायला, शिकायला हवं म्हणजे मग चांगला पैसा लाभतो. शाळेत जायला हवं— शाळेत. आलं ध्यानात ?"

' चांगला पैसा मिळायला हवा, तर शाळेत जायला हवं.' एवढा मतलब ध्यानी घेऊन स्वारी घरी परतली.

आणि दुसऱ्याच दिवशी वर्णमाला हे प्राथमिक पुस्तक खरेदी

करून तो शाळेची वाट चालू लागला. तर शाळेच्या वाटेवर रुपयांनी भरलेली एक थैली त्याला अचानक मिळाली. थैली मिळताच तो एवढा खूष झाला की पुढं शाळेत न जाता तो माघारी घरी परतला. शाळेला गेल्यानं चांगले पैसे मिळतात हे जोसेफचं म्हणणं त्याला पटलं. कारण तशी प्रचीतीच आली होती.

मिळालेल्या पैशातून त्यानं घरात लागणारं सर्व प्रकारचं सामान भरपूर खरीदलं. कपडालत्ताही घेतला. आता तो बायकोसह मजेत राहू लागला.

खरी गोष्ट अशी होती की, कुणा परदेशी माणसाची ती थैली त्याच्या नकळत रस्त्यात पडली होती. तो परदेशी माणूस आपल्याच तंद्रीत पुढं निघून गेला होता, आणि तेवढ्यातच पाठीमागून आलेल्या या स्वारीला ती थैली सापडली होती.

तिकडं तो परदेशी, थैली हरवल्याचं लक्षात येताच, पोलिसांकडं गेला. चौकशी करता पोलिसांना कळलं, की कुणी एक गरीब माणूस अचानक पैशांचा धनी बनलाय्. म्हणून पोलिसांनी त्याला बोलावून घेतलं. पोलिस अधिकाऱ्यानं त्याला विचारलं,

"एवढे पैसे तुला कसे, कुठं मिळाले ?"

तो भाबडेपणानं उत्तरला, "मी शाळेत शिकायला जात असताना वाटेत पैशाची थैली मिळाली होती."

त्याच्याकडं पाहात अधिकाऱ्यानं विचार केला, 'हा माणूस तिशीच्या आत दिसतोय्. म्हणजे... वीस-पंचवीस वर्षांपूर्वी हा शाळेत जात असेल ! म्हणजेच याला थैली मिळाल्याची गोष्ट फार जुन्या काळची दिसते. त्या परदेशी माणसाच्या नुकत्याच हरवलेल्या थैलीशी याचा संबंध दिसत नाही.'

असा विचार करून त्या पोलिस अधिकाऱ्यानं त्याला सोडून दिलं.

त्या मूर्ख माणसाच्या मनात मात्र ही गोष्ट पक्की बिंबून राहिली, की शाळेत शिकायला गेल्यानं पैशांचा लाभ होतो !... (आधारित)

# २ शहाला काटशह

एकदा एका शेतकऱ्याला बाहेरगावी आपल्या मुलीच्या सासरी जायचं होतं. घरचा आता तो एकटाच होता. नुकतंच धान्य विकून त्याच्या गाठी पाचेकशें रुपये जमले होते. बंद घरात आपल्यामागं ते ठेवणं धोक्याचं होतं. तसंच प्रवासात एवढी रक्कम जवळ बाळगणंही धोक्याचं म्हणून शेजाऱ्याकडं जाऊन तो म्हणाला, "मी परत येईस्तवर एवढे पैसे राहू द्यात तुमच्याकडं."

पण शेजारी होता धोरणी. मनाशी कावा रचत तो साळसूदपणे म्हणाला, "घरात नको बाबा! कुठं चोरीबिरी झाली तर? वेळकाळ काही सांगून येत नाही. तसं झालं तर नस्ती बिलामत आमच्या अंगावर यायची. त्यापेक्षा आपण असं करू, गावच्या देवळाच्या पाठीमागं आमराई हाय न्हवं? त्यातल्या एका खुणेच्या झाडाच्या तळाशी पैशाचं गाडगं रातचं चुपचाप पुरून ठेवलेलं बरं. तू माघारी आलास म्हणजे रातचंच उकरून काढायचं. कसं?"

दुसरा मार्ग दिसत नसल्यानं शेतकऱ्यानं शेजाऱ्याला विश्वासानं संगती घेतलं अन रात्रीच्या वेळी पैशांचं गाडगं नेऊन पुरून ठेवलं. मग तो निश्चिंतपणे लेकीकडे गेला.

दहाबारा दिवसांनी तो गावाकडं परतला. गाव गाठेपर्यंत रात्र झाली होती. देवळापाठीमागल्या आंबराईजवळ येताच त्याला पुरून ठेवलेल्या आपल्या पैशांची आठवण झाली. तब्बल पाचशे रुपये होते ते. ते जागच्या जागी आहेत की नाहीत, याची धाकधूक त्याला वाटतच होती नाहीतरी. अनायसे रात्रीची वेळ आहे तर लगेच खात्री करून घ्यावी, असं मनाशी ठरवून तो खुणेच्या झाडापाशी गेला. जावयानं भेट दिलेलं टिकाव सुदैवानं यावेळी त्याच्या खांद्यावर होतंच. वाटेतल्या नदीवर मिळालेला एक मोठा खेकडा असलेली पुरचुंडी बाजूला ठेवून त्यानं झपाझप ती जागा उकरली. एकदाचं पैशाचं गाडगं लागलं. पण झाकण उघडून पाहिलं तर ते पार रिकामं. सगळेच्या सगळे पैसे गायब झालेले. त्याच्या मनात पाल चुकचुकली. हे शेजाऱ्याचंच काम असलं

पाहिजे ! पण चोरी तो कशी कबूल करील ? दुसऱ्या कुणीतरी चोरी केली, असा कांगावा करील. सरळ विचारून अर्थातच तशी दाद नाही लागायची. काहीतरी हिकमत लढवायला हवी.

उकरलेली माती पुन्हा नीट केली, आणि मनाशी एक शक्कल योजून तो आधी परस्पर त्या शेजाऱ्याकडं गेला. त्याला म्हणाला, "जावईबुवानं काही रक्कम शेती वाढवायला म्हणून भेट दिलीया. उद्याच्या उद्या मला तालुक्याच्या गावाला जायचं हाय. एवढी रक्कम उगाच घरात नको. हीसुद्धा आपण आज मध्यरात्रीच्या वक्ताला त्याच गाडग्यात पुरून ठेवू या. आता किती वाजले ? आठ ? बरं हाय. बारा वाजायच्या सुमाराला जाऊ या. आताच आलोय. घरला जाऊन पोरीनं दिलेली शिदोरी खाऊन घेतो तोवर."

शेतकरी निघून जाताच धूर्त शेतकऱ्याच्या डोक्यात नवीन कल्पना चमकली. पूर्वीची रक्कम सुरक्षित आहे हे पाहील तेव्हाच गडी नवीन रक्कम त्यात जमा करील. म्हणून मध्यरात्रीला त्याच्या संगत जायच्या आधी त्याची पूर्वीची रक्कम गाडग्यात जशीच्या तशी ठेवायला हवी, तरच आपल्याला या भरीच्या रकमेसह सगळंच घबाड चारदोन दिवसांनी गुपचूप लुबाडता येईल.

आणि जास्त पैसे फुकटफाकट मिळवायच्या लोभानं शेजारीबुवा लगबगीनं ताबडतोब आमराईत गेले अन आधीचे चोरलेले पाचशे रुपये गाडग्यात बिनबोभाट ठेवून आले.

ठरल्याप्रमाणं मध्यरात्रीला दोघं जोडीनं गेले तेव्हा शेतकऱ्याला गाडग्यातले आपले आधीचे पैसे जेवढ्यास तेवढे आढळले. बांधून आणलेली नवी पुरचुंडी त्यातल्या गाडग्यात ठेवली अन त्याचबरोबर आधीचे पाचशे रुपये, आपल्याच तंद्रीत खुषीची गाजरं खात बसलेल्या शेजाऱ्याच्या नकळत शिताफीनं गुपचूप काढून घेतले. मग त्या गाडग्यावर रीतसर माती टाकून ते घरी परतले.

आता आपल्याला जास्त घबाड मिळणार, या लोभापायी शेजारीबुवांना नंतर स्वस्थ झोपच लागली नाही. त्याला धीर निघेना. शेतकऱ्याचा विचार बदलला तर तो कदाचित उद्याच्या उद्यासुद्धा आपले

सगळेच पैसे काढून घेईल, तेव्हा उद्याच्या रात्रीपर्यंतसुद्धा न थांबता आपला कार्यभाग ताबडतोब साधावा हे बरं! असा पोक्त विचार करून शेजारीबुवांची स्वारी पहाटे पहाटेलाच गुपचूप आमराईत गेली. पण ते गाडगं उघडून बघतो तर त्यात फक्त ताजी टाकलेली पुरचुंडी. हिच्यात किती रक्कम आहे ते तरी पाहू या म्हणून स्वारीनं ती खोलली. तर हातात आला भलामोठा खेकडा. त्याने तत्काळ आपल्या दोन्ही मोठाल्या आकड्यांनी स्वारीच्या तळहाताचे चक्क लचके तोडले. ओरडायची पाळी आली, पण चोरीचा मामला, हळूहळू ओरडा अशी स्थिती. खेकड्याचे आकडे जिवाच्या आकांताने कसेबसे सोडवून घेत त्याला दूर भिरकावून दिलं आणि रक्तबंबाळ हात सावरीत कळा सोशीत स्वारी मुकाट घरी येऊन झोपली. (आधारित.)

## ३ राजापूरची गंगा


कोकणात राजापूर नावाचं तालुक्याचं ठिकाण आहे. या गावानजीकच्या एका टेकडीतून अचानक कधीकधी पाण्याचा प्रवाह वाहू लागतो. तो थोडे दिवस चालू राहतो व मग आला तसाच अचानक गुप्त होतो. या प्रवाहाला भाविक लोक गंगा मानतात. हा प्रवाह चालू असलेल्या काळात तिथं यात्रा भरते. लोक या प्रवाहात श्रद्धापूर्वक स्नानही करतात. कारण या पाण्यात गंगेच्या पाण्याचे गुणधर्म असल्याची भाविकांची श्रद्धा असते. संधिवात व कातडीचे रोग या पाण्यानं बरे होतात, असंही बोललं जातं.

राजापुरात गंगा अवतरते, तेव्हा तिचं पाणी चौदा कुंडांतून वाहतं. त्यांतलं काशीकुंड प्रमुख मानतात. नवल असं की, यांतल्या प्रत्येक कुंडातल्या पाण्याचं उष्णतामान वेगवेगळं असतं.

छत्रपती शिवाजीमहाराज, तसंच कविवर्य मोरोपंत यांनी या गंगेत स्नान केलं होतं, असं म्हणतात.

राजापूर गावात विठ्ठलाचं मंदिर आहे, तिथं आषाढ व कार्तिक या महिन्यांत एकादशीनिमित्त यात्रा भरते.

# ४ दूरदर्शीपणा



फार फार पूर्वीच्या काळी चोराला चक्क सुळावर चढवीत अन् तेही निंबाच्या झाडाच्या लाकडावर. त्या काळी एकदा काय झालं– एके रात्री एका चोरानं एका गावात चोरी केली आणि रातोरात तो त्या गावाबाहेर पळाला. काही अंतरावर एक रान होतं. तिथं पोचेपर्यंत पहाट होत आली. तो तर पळून पळून थकला होता. सकाळपर्यंत रानात काय कुणी येत नाही. तेव्हा तिथंच दिवस उजाडेपर्यंत झोपावं अन् मग पुढं आपल्या गावाची वाट धरावी असा विचार त्यानं केला. आणि तिथल्या एका निंबाच्या झाडाखाली तो झोपला.

पण दिवस उजाडायला आला तरी चोराची स्वारी निजून उठ- ण्याचं चिन्ह दिसेना. कारण तो दमला-भागल्यानं गाढ झोपी गेला होता. त्या निंबवृक्षाच्या देवतेनं हे पाहिलं आणि ती अस्वस्थ झाली. त्याला जागं करून ती म्हणाली: ‘ मूर्खच दिसतोएस तू. चोरी करून आलास अन् दिवस उजाडायला आला तरी खुशाल झोपून राहिलाएस की ! आता त्या गावातले लोक तुझा शोध घेत येतील. मग तू चांगलाच

त्यांच्या तावडीत सापडशील. अर्थात ते तुला ठार मारल्याशिवाय राहणार नाहीत. चल, निघून जा इथनं."

तिचं म्हणणं खरं होतं. अर्थात ते चोराला पटलं आणि उशाशी घेतलेला चोरीचा माल घेऊन तो घाईगडबडीनं आपल्या गावाच्या दिशेनं पळत निघाला.

निंबाच्या झाडाजवळ एक पिंपळवृक्ष होता. त्याच्यावरच्या अश्वत्थ देवतेनं हा प्रकार पाहिला. तेव्हा नवल करीत तिनं निंबदेवतेला विचारलं: "काय ग, तो बोलून चालून चोर. चोरीसारखं अपकृत्य करून आलेला, अशा स्थितीत लोकांनी त्याला पकडून शिक्षा केली, तर ते योग्यच होईल की ! त्याला मुद्दाम उठवून इथनं पळून जायला प्रवृत्त केलंस ते काय म्हणून ?"

"अश्वत्थदेवते," निंबदेवता शांतपणे सांगू लागली, "हे बघ, माझं हे करणं वरवर पाहता तुला गैर वाटणं साहजिक आहे. कारण त्यातलं मर्म तू ओळखलं नाहीस. अग, या चोराला लोकांनी पकडलं, अन शिक्षा केली, तर माझी त्याला काहीच हरकत नाही. पण त्याला सुळावर देण्यापायी माझाही मरणकाळ ओढवेल हे तुझ्या ध्यानी आलेलं दिसत नाही: त्याच्याकरिता सूळ बनवण्यासाठी लोक माझ्या या झाडावरच बेधडक कुऱ्हाडी चालवतील नि माझा निकाल लावतील. कारण माझं झाड त्यांना इथल्या इथं आयतं सापडेल. चोराला सुळी देण्यासाठी निंबाच्या लाकडाचा सूळ या देशात वापरतात हे विसरलेली दिसतेस तू."

निंबदेवतेचं बोलणं संपेपर्यंत गावातले लोक चोराचा माग काढीत तिथवर येऊन पोचले. चोर धांदलीगडबडीनं पळून गेला, तेव्हा चोरीच्या काही वस्तू, निंबाच्या झाडाच्या मुळाशी राहून गेलेल्या त्या लोकांना आढळल्या. त्यावरून त्यांनी तर्क केला, की 'इथंच तो रात्री झोपला असला पाहिजे. उजाडताच उठून पळून गेलेला दिसतो बदमाश. त्याआधी आलो असतो तर नक्की सापडला असता. आणि ज्या या निंबाच्या झाडाचा त्यानं आसरा घेतला होता, त्याचाच सूळ बनवून त्यावर त्याला सुळी देता आलं असतं.'

चोर हातचा निसटल्याबद्दल खंत करीत ते लोक निराशेनं निघून गेले. तेव्हा अश्वत्थ देवता निंबदेवतेला बोलली: "खरं आहे बाई, तुझं म्हणणं. त्या चोराबरोबर तुझ्याही जिवावर बेतलं असतं. खरोखरच तू दूरदर्शी म्हणून तुझं झाड वाचलं."

## ५ ज्येष्ठाचा महिमा

भारतीय वर्षगणनेतला ज्येष्ठ हा तिसरा महिना. ग्रीष्म ऋतू या महिन्यापासूनच सुरू होतो. या महिन्याच्या पौर्णिमेच्या सुमारास ज्येष्ठ नक्षत्र असतं. म्हणून याला ज्येष्ठ असं नाव पडलं.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला शिवराज्याभिषेक साजरा करतात. तर वटपौर्णिमा गणल्या गेलेल्या ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशी भारतीय नारी सावित्रीव्रत आचरतात.

ज्येष्ठ पौर्णिमेला वेद प्रकट झाले, असं मानलं जातं. म्हणून त्या दिवशी वेदांची पूजा इष्ट मानतात.

ज्येष्ठ वद्य अष्टमीला शंकराची आणि वद्य चतुर्दशीला रेवतीची पूजा निळ्या रंगाच्या फुलांनी करावी, असं सांगितलं आहे.

ज्या जेष्ठा नक्षत्रावरून या महिन्याला ज्येष्ठ असं नाव पडलं, ते नक्षत्र म्हणजे आकाशातील वृश्चिक राशीच्या आकृतीच्या पोटातील तीन तारकांचा पुंज होय. त्यांच्यातील मधली ठसठशीत तारका एवढी लाल रंगाची आहे की, आकाशातील दुसऱ्या कोणत्याही तारकेला तेवढी लाली नाही.

पृथ्वीपासून २५० प्रकाशवर्षांच्या अंतरावर असलेलं ज्येष्ठा नक्षत्र हिरव्या रंगाच्या एका सहचरीमुळं व्याधताऱ्यासारखीच ही जोडतारका आहे. मृगनक्षत्राप्रमाणं ज्येष्ठा नक्षत्रही अंतराळातील एक त्रिकांड आहे.

या नक्षत्रावर शेतीची कामं करणं, विहीर-तलाव खोदणं वगैरे कृत्यं केल्यास यश लाभतं, असं म्हटलं आहे.

## ६ सांगकाम्या नोकर

एका वकिलाकडं होता एक नोकर. पण तो होता वेडगळ– नुसता सांगकाम्या. अकलेचं नि त्याचं वाकडं होतं.

एके दिवशी घरून कोर्टात जाताना वकिलाचं पैशाचं पाकीट वाटेत कुठंतरी पडलं नि हरवलं. म्हणून तो घरी आल्यावर नोकराला म्हणाला : "मी कोर्टात जाताना तू रोज माझ्या पाठीमागनं राहायचं नि माझ्या हातून किंवा खिशातून काही वस्तू खाली पडली, तर ती उचलायची अन् मला कोर्टात आणून द्यायची."

दुसऱ्या दिवशी वकील कोर्टात जायला निघाला. वाटेत त्यानं केळी विकत घेतली अन् उभ्याउभ्याच ती खाऊन टाकली. साली रस्त्याच्या बाजूला फेकून दिल्या. मग तो कोर्टात गेला. इकडं त्या नोकरानं धन्यानं टाकून दिलेल्या केळ्याच्या साऱ्या साली दक्षतेनं गोळा केल्या. एवढंच नव्हे, तर त्या घेऊन धन्याच्या मागून गेला.

वकीलमहाशय कोर्टालगतच्या वकिलांच्या खोलीत इतर वकील-मंडळींशी बोलत टेबलाशी बसलेले होते. तेवढ्यात त्या नोकरानं केळ्याच्या त्या साली धन्याच्या पुढ्यात टेबलावर नेऊन ठेवल्या. वर तो तत्परतेनं धन्याला म्हणतो कसा– "तुम्ही सांगितल्याप्रमाणं, वाटेत तुमच्या हातून आज पडलेल्या या एवढ्याच वस्तू."

सगळेजण हसत सुटले. वकिलानं वैतागानं नोकराला घरी हाकललं आणि कसंनुसं हसत उद्‌गारले : "येडचाप ! सांगकाम्या आहे नुसता."

घरी परतल्यावर वकीलसाहेब केळ्यांच्या सालीबद्दल त्या नोकराला रागावले आणि म्हणाले : "उद्यापासून तू आपला घरीच राहा. काही काम निघालं तर तेवढं मला सांगायला कोर्टात ये."

थोडे दिवस गेले. एके दिवशी वकिलीणबाई नोकराला म्हणाल्या : "कोर्टात जा नि मालकांना सांग, की, घरात तांदूळ अन् साखर बिलकूल शिल्लक नाही. तेवढी लगेच व्यवस्था करा."

नोकराची स्वारी कोर्टात गेली, तर वकीलसाहेब खटल्याच्या

कामासाठी न्यायाधीशापुढं जात होते. त्यांना हाक मारून नोकर ओरडला : "साहेब, घरातले तांदूळ नि साखर संपलीयत. तेवढं लगेच पाठवायची व्यवस्था करायला सांगितलंय बाईसाहेबांनी."

आजूबाजूचे लोक हसू लागले. वकीलसाहेब ओशाळले. नोकराचा त्यांना संताप आला. पण तिथं त्याला काय बोलणार ? मनातून चरफडत त्यांनी त्याला घरी हाकलून लावलं.

संध्याकाळी घरी गेल्यावर ते नोकराला चिडून म्हणाले– "असला निरोप कोर्टात चारचौघांसमोर असा ओरडून सांगतात का ? पुन्हा कधी काही निरोप सांगायचा झाला, तर मी एकटा आहेसं पाहून सांगत जा."

आणखी काही दिवसांनंतरची गोष्ट. वकीलसाहेब कोर्टात असताना त्यांच्या घराला अचानक आग लागली. ती खबर वकिलाला जाऊन सांगायला बाईसाहेबांनी नोकराला तातडीनं पिटाळलं.

नोकराची स्वारी धावतच कोर्टात गेली. तर वकीलसाहेब खोलीत अशीलांशी बोलत बसले होते. ते सारेजण आपलं काम आटोपून निघन जाईपर्यंत बराच वेळ नोकराची स्वारी दाराबाहेर उभी राहिली. शेवटी, मालक एकटे आहेत असं पाहून स्वारी पुढं सरसावली, अन् म्हणाली : "साहेब, आपल्या घराला आग लागलीय्. तुम्हाला सांगण्यासाठी मी बऱ्याच वेळापूर्वी येऊन बाहेर थांबलो होतो. पण तुम्ही एकटे नव्हता म्हणून पुढं येऊन सांगितलं नाही."

वकीलसाहेब यावर काय बोलणार ? कपाळावर हात मारून घेत ते ताडकन् उठले आणि तातडीनं घरी गेले. तोवर घर अर्धअधिक जळालं होतं. सुदैवानं शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मदतीमुळं आग आटोक्यात आली होती अन् घरातल्या मौल्यवान चीजवस्तू बाईसाहेबांच्या धडपडीमुळं वाचल्या होत्या.

आता मात्र वकीलसाहेबांनी त्या नोकराला सोडचिठ्ठी दिली.

# ७ अती शहाणे



एका गावात चौघेजण मूर्ख एकमेकांचे मित्र होते. एकदा शहरात जाऊन झटपट पैसा कमावण्याचं त्यांनी ठरवलं. पंचवीस-पंचवीस रुपये गाठीला बांधून घेऊन ते निघाले.

चालता-चालता वाटेत एका शेतकऱ्याच्या झोपडीपाशी त्यांना एक बैल दिसला. तो बैल विकत घ्यावा अन् शहराच्या बाजारात जास्त पैसे घेऊन विकावा, असं त्यांनी ठरवलं. मग त्या शेतकऱ्याकडं जाऊन ते त्याला म्हणाले : "पंचवीस रुपयांना हा बैल दे आम्हाला."

खरं तर तो बैल म्हातारा नि निरुपयोगी बनला होता. तेव्हा शेतकऱ्यानं आनंदानं तो त्यांना विकून टाकला. बैल घेऊन मूर्खांची ती चौकडी पुढं निघाली.

वाटेत तो बैल मुतू लागला. तर या मूर्खोबांचा समज झाला, बैलाचं पोट फुटून त्यातनं पाणी बाहेर पडतंय्. म्हणून ते त्या बैलासह पुन्हा त्या शेतकऱ्याकडं गेले. त्यांचं ते विक्षिप्त म्हणणं ऐकून शेतकऱ्याची

खूप करमणूक झाली. या मूर्ख चौकडीची चांगलीच फजिती करावी, असं मनाशी योजून तो म्हणाला–

'मग तुम्ही असं करा. या बैलाऐवजी ही म्हैस घ्या. पण हिचे शंभर रुपये पडतील."

त्यांच्यापाशी पाऊणशे रुपये उरलेले होते. तर ते देऊन त्यांनी ती म्हैस घेतली. खरं तर ती म्हैस भाकड– बिलकुल दूध न देणारी होती.

म्हैस बरोबर घेऊन ते पुन्हा आपल्या मार्गाला लागले. वाटेत त्यांना एक नदी लागली. ती पार करून जाताना आपण कदाचित पाण्यात बुडू, अशी भीती त्यांना वाटली. म्हणून दोघांनी म्हशीची शेपटी घट्ट धरली, तर दुसऱ्या दोघांनी तिची शिंगं पकडली. अशाप्रकारे ते नदी ओलांडून एकदाचे पलीकडं गेले.

पण नदीतून आपण सारेजण सुखरूप काठावर आलो की नाही, अशी शंका त्यांना आली. म्हणून एकजण स्वतःला सोडून बाकीच्यांची गणती करू लागला. तर तिघंजणच आढळले. खात्री करून घेण्यासाठी बाकीच्या तिघांनी तशीच गणती केली. अर्थात त्यांनाही तिघेचजण उरलेले आढळले. तेव्हा, आपल्यापैकी एकजण नदीतून येताना बुडाला, म्हणून ते गळा काढून रडू लागले.

तेवढ्यात मघाचा तो शेतकरी तिथं आला. सारेजण चक्क रडत बसलेले पाहून त्याला नवल वाटलं. त्यानं रडण्याचं कारण विचारलं. रडतरडतच त्यांनी कारण सांगितलं. खात्री करून घेण्यासाठी आपल्यापैकी प्रत्येकानं कशी गणती केली तेही त्यांनी प्रत्यक्ष दाखवून दिलं.

आता यांच्या या कर्माला हसावं की यांची कीव करावी, असा प्रश्न त्या शेतकऱ्याला पडला. अनावर झालेलं हसू आवरीत शेवटी तो त्यांना म्हणाला–"हे बघा गड्यांनो, तुमचा चौथा मित्र मी मिळवून दिला, तर तुम्ही मला काय बक्षीस द्याल ?"

"बक्षीस ?" चौघेही मूर्खशिरोमणी उद्गारले, "ही म्हैसच परत देऊन टाकू तुला. मित्रापुढं तिची काय किंमत ?"

मग त्या चौघांना रांगेत उभं करून शेतकऱ्यानं क्रमाक्रमानं एकेकावर काठीचा फटका मारला, अन् एक, दोन, तीन, चार असे

मोजून दाखवले.

आपण चौघेहीजण सुखरूप असल्याचं कळून चुकताच ते सारेजण हर्षभरित झाले. यापुढं आपण एकमेकांची जास्त काळजी घ्यायला हवी, असं त्यांनी आपसात ठरवलं.

आपला गमावलेला एक मित्र मिळवून दिल्याबद्दल शेतकऱ्याचे आभार मानून त्याची म्हैस त्यांनी बक्षीस म्हणून त्याला परत दिली. आणि जास्त पैसे कमावण्याचा बेत सोडून देऊन, हरवलेला मित्र सापडल्याच्या आनंदात ते आपल्या गावी परतले.

## ८ सत्यनिष्ठेचं चीज

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. एका गावात एक गरीब ब्राह्मण राहायचा, एका देवळाची व्यवस्था तो पाहायचा. त्याबद्दल त्याला दरमहा पाचसहा रुपये मिळायचे. त्या उत्पन्नात काटकसरीनं राहून तो आपल्या कुटुंबाचं पोषण करायचा.

एके दिवशी देवळातली कामगिरी आटोपून तो घरी जात होता. तर वाटेत त्याला एक थैली सापडली. ती उघडून बघतो, तर तीत सोन्याच्या मोहरा भरलेल्या. ती थैली घेऊन तो घरी गेला. ती थैली बायकोला दाखवीत त्यानं विचारलं : "काय ग, हिचं काय करावं, असं तुला वाटतं ?" ती लगेच बोलली : "त्यात काय विचारायचं ? आपली गरिबी पाहून देवानंच आपल्याला दिलेली दिसते. अनायासं लाभलेल्या लक्ष्मीला हातचं का जाऊ द्यायचं ? खुशाल ठेवून घ्या ती."

ब्राह्मण गरीब असला तरी शीलवान, सदाचारी होता. बायकोचं मन पाहावं म्हणूनच केवळ त्यानं तिचं मत अजमावलं होतं. एरव्ही त्या थैलीच्या मालकाचा शोध घ्यायचा नि त्याची थैली जशीच्या तशी त्याच्या स्वाधीन करायची, असं त्यानं मनाशी ठरवलं होतं. अर्थात बायकोचा सल्ला न मानता त्यानं थैलीच्या मालकाचा शोध चालवला.

चौकशी करता-करता त्या थैलीचा मालक शेजारच्या नगरीत

राहत असल्याचं त्याला कळलं. तेव्हा त्याचं घर त्यानं शोधून काढलं आणि त्याचीच ती थैली असल्याची खात्री करून घेऊन त्यानं ती त्याच्या स्वाधीन केली. ती थैली आपल्याला कुठं मिळाली हे सांगून ब्राह्मण त्याचा निरोप घेऊ लागला. थैलीच्या मालकानं त्याचे आभार मानले आणि त्याला निरोप दिला. त्याला बक्षीस वगैरे मात्र काही दिलं नाही. ब्राह्मणही काही न बोलता मुकाट निघून गेला.

रिकाम्या हातांनी ब्राह्मण घरी परतताच त्याच्या बायकोनं त्याची चांगलीच हजेरी घेतली. तो फारसं काही बोलला नाही. 'केवळ फायद्या-कडं दृष्टी ठेवून सत्यनिष्ठेनं वागायचं नसतं.' एवढंच बोलून तो आपल्या नेहमीच्या कामाला लागला.

काही दिवस निघून गेल्यावर थैलीच्या त्या श्रीमंत मालकानं ब्राह्मणाला आपल्या घरी जेवायला बोलावलं. इतर काही ब्राह्मणांनाही भोजनाला बोलावलं होतं. भोजन आटोपल्यावर इतर ब्राह्मणांना रीतसर दक्षिणा देऊन यजमानानं त्यांची बोळवण केली. या ब्राह्मणाला मात्र त्यानं मागं ठेवून घेतलं. बाकीचे ब्राह्मण निघून गेल्यावर, हरवलेली जी थैली त्या ब्राह्मणानं प्रामाणिकपणानं आणून दिली होती, तीच यजमानानं त्याला दक्षिणा म्हणून दिली, आणि म्हटलं, "भटजी, माझी हरवलेली थैली तुम्ही आणून दिलीत, त्यावेळी कसलंच काही बक्षीस दिलं नाही मी तुम्हाला. मुद्दामच दिलं नव्हतं. कारण तुम्ही खरोखरीचे सचोटीचे आहात, तसेच कोणतीही अपेक्षा न बाळगता शांत वृत्तीचे आहात की नाही, याची प्रचीती मला घ्यायची होती. आता तुमच्या खऱ्या सत्य-निष्ठेबद्दल माझी खात्री झाली आहे. म्हणून त्यावेळी देणार होतो, त्या बक्षिसापेक्षा दसपटीनं जास्त असं हे बक्षीस मी तुम्हाला स्वखुषीनं देत आहे."

# ९ योगिनी एकादशी

**ज्येष्ठ वद्य** एकादशीला योगिनी एकादशी मानतात. योगिनी या गौण देवता असून त्यांना आवरण देवता असंही म्हणतात. यांना पार्वतीच्या सख्या मानलं गेलं आहे. यांच्यातल्या चौसष्ट योगिनी प्रसिद्ध. त्यांपैकी आठ विशेष प्रसिद्ध आहेत. त्या म्हणजे– मंगला, पिंगला, धन्या, भ्रामरी, भद्रिका, उल्का, सिद्धा व संकटा या होत.

मध्य प्रदेशात भेडाघाट इथं, नर्मदेच्या तीरावर योगिनीचं मंदिर आहे. प्रत्येक मूर्तीच्या खाली तिचं नाव कोरलेलं आहे. शिल्प सुंदर असून तंत्रशास्त्राप्रमाणं त्यांची घडण केलेली आहे. शिवसागराच्या तीरावर खजुराहो इथंही ६४ योगिनींचं मंदिर आहे; पण त्यांतल्या अवघ्या तीनच उरलेल्या आहेत.

एकदा प्रलय होऊन सर्व ब्रह्मांड नाश पावलं. फक्त पंचमहाभूतं आणि महेश-महेशानी तेवढीच उरली. आता राहायचं कुठं ? अशी चिंता महेशाला पडली. म्हणून राहण्याचं एखादं ठिकाण निर्माण करायला त्यानं महेशानीला सांगितलं. पण तिनं त्याची सूचना झिडकारून टाकली. तेव्हा त्यानं स्वतःचं भस्म करून त्यापासून घोर नावाच्या राक्षसाची उत्पत्ती केली. महेशानी पश्चिम दिशेकडे गेली, तिथं तो राक्षस तिच्या नजरेस पडला. राक्षसानंही तिला पाहिलं. तेव्हा तिच्यावर त्याचं मन जडलं. ती आपली व्हावी म्हणून तिला तो विनवू लागला. पण ती त्याला म्हणाली : "जो कुणी माझ्याशी युद्ध करून मला जिंकील त्याच्याशीच लग्न करण्याचा माझा निश्चय आहे." मग त्यानं तिच्याशी युद्ध आरंभलं. घोर राक्षस निकरानं लढू लागला: आता त्याच्यापुढं महेशानी तग धरू शकणार नाही, अशी वेळ आलेली पाहताच महेशानं सूक्ष्म देह धारण करून तिच्या देहात प्रवेश केला. तेव्हा घोर हतबल झाला. त्याला महेशानी दिलासा देत म्हणाली : "माझा लाभ करून घेण्यासाठी तू एवढा अटीतटीनं लढलास. यावरून तू महेशच असला पाहिजेस. म्हणून मी तुला ब्रह्मानंदाची प्राप्ती करून देणारं माझं रूप दाखवते."

आणि काही क्षणांतच तिनं अती भयंकर रूप धारण केलं. तिच्या तेजोमंडळातून तेजस्वी, महापराक्रमी अशा असंख्य योगिनी स्त्रिया प्रकट झाल्या. महेशानीचं ते विराटरूप पाहून घोर राक्षस मूर्च्छा येऊन पडला. त्याला मग ब्रह्मानंदाची प्राप्ती झाली.

## १० त्र्यंबकेश्वर

नासिकजवळच्या ब्रह्मगिरी या डोंगरावर गोदावरी नदीचं उगमस्थान आहे, तर त्या डोंगराच्या पायथ्याशी त्र्यंबकेश्वराचं मंदिर– बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक मानलं गेलेलं आहे. या क्षेत्राबद्दल एक पुराणकथा आहे, ती अशी–

आपण सृष्टिकर्ते आहोत, त्या अर्थी शिवमहिम्याचे जाणकार आपणच, असा गर्वाचा विचार ब्रह्मदेवाच्या मनात एकदा आला. भगवान विष्णू त्याला विनयानं म्हणाला : “ खूप तप केलं असूनही मला मात्र शिवाचं नीट ज्ञान झालेलं नाही. तेव्हा आपण असं करू या : तू शिवाच्या मस्तकाचा शोध लाव. मी त्याच्या चरणांचा शोध घेतो.”

ब्रह्मदेव या गोष्टीला कबूल झाला. मग ते आपापल्या कामगिरीवर निघाले. पण बराच काळ प्रयत्न करूनही दोघांनाही तो शोध लागेना. मग ब्रह्मदेवानं लबाडीचा डाव योजला. स्वतःच केतकीपुष्प व गाय निर्माण केली, आणि त्यांना पढवून आपले खोटे साक्षीदार बनवले. आणि देवलोकात जाऊन त्यानं बेधडक सांगितलं, की, आपण शिवाचं मस्तक हुडकून काढलं, एवढंच नव्हे, तर गाईच्या दुधानं त्यावर अभिषेक केला आणि केतकीपुष्पानं त्याची पूजासुद्धा केली.

गाय अन् केतकीपुष्प यांनी त्याच्या खरेपणाबद्दल (अर्थातच खोटी) साक्ष दिली.

पण खुद्द शिवानं ब्रह्मदेवाची लबाडी अचूक जाणली आणि त्यानं संतापून जाऊन ब्रह्मदेवाला शाप देत सुनावलं– “ यापुढं पृथ्वीवर तुझी

पूजा कुणीही करणार नाही."

खोटी साक्ष दिल्याबद्दल केतकीपुष्पाला आपल्या पूजाविधीतून शिवानं बहिष्कृत केलं; आणि 'खोटी साक्ष देणारं तुझं तोंड सदाचं अपवित्र राहील', असा शाप गाईला दिला.

यामुळं ब्रह्मदेव चिडला आणि त्यानं शिवाला उलटा शाप दिला—"तू पृथ्वीवर पर्वत होऊन राहशील!"

पण राग निवळताच ब्रह्मदेवाला आपली चूक कळून आली. त्याला पश्चात्ताप झाला. शिवाची कृपा व्हावी म्हणून त्यानं शिवस्तुती आरंभली. तेव्हा भोळा शंकरही प्रसन्न झाला आणि ब्रह्मदेवाचा शाप खोटा ठरू नये म्हणून त्यानं भूतलावर पर्वताचं रूप धारण केलं. एवढंच नव्हे, तर लोकांना ब्रह्मदेवाचं स्मरण व्हावं म्हणून त्याचं नाव ब्रह्मगिरी असं योजलं. ज्योतिर्लिंगाचं स्थान पर्वताच्या पायथ्याशी त्र्यंबकेश्वर म्हणून ओळखलं जात असलं, तरी ब्रह्मगिरी हाच प्रत्यक्ष त्र्यंबकेश्वर असल्याचं मानलं जातं.

त्र्यंबकेश्वर मंदिरात शिवासमोर नंदी आहे तो शुभ्र पाषाणाचा. देवळाच्या भिंतीवर बाहेरच्या बाजूनं देखण्या शिल्पाकृती आहेत. पक्ष-द्वाराच्या घुमटीवर कमळं कोरलेली आहेत, ती तर ताजी-टवटवीत असल्याचा भास डोळ्यांना होतो.

त्र्यंबकेश्वराच्या शिवलिंगावर एक लहानशी चीर आहे; व तिच्यातून सतत पाणी झिरपत असतं.

जवळच गंगासागर तलावाच्या काठावर निवृत्तीनाथांचं समाधि-मंदिर असून तिथं दरसाल ज्येष्ठ वद्य द्वादशीला (त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्तानं) मोठी यात्रा भरते. इथलं कुशावर्त तीर्थ महापवित्र मानलं जातं. हे ८१ × ७४ फूट व्यासाचं चौरस आकाराचं कुंड आहे. त्यात उतरून जाण्यासाठी चहूबाजूंनी पायऱ्या बांधल्या आहेत.

## ११ गारुड्याचे माकड

एका गारुड्याकडं एक माकड होतं. त्याचं नाव त्यानं ठेवलं होतं सालक. गारुडी त्याला सापाबरोबर खेळवी आणि पैसे मिळवी. एके दिवशी या सालक माकडाच्या हातून काहीतरी चूक झाली. म्हणून त्यानं सालकाला काठीनं खूप बदडलं.

त्या दिवशी दुपारी तो गारुडी एका बागेत विसावा घ्यायला गेला. सालकाला एका दोरीनं एका लहानशा झाडाला बांधून ठेवलं अन् स्वतः तो, बाजूच्या मोठाल्या झाडाच्या सावलीत बुंध्याला डोकं टेकून झोपी गेला.

मालक गाढ झोपी गेलेला पाहून सालकानं पळून जाण्याचा बेत योजला. कारण मालकानं आज त्याला एवढं बेदम मारलं होतं, की त्याचं अंग अजून ठणकत होतं. ज्या दोरीनं त्याला बांधलेलं होतं ती दोरी त्याने दातांनी कुरतडून-कुरतडून तोडून टाकली आणि तो झरझर एका उंचशा झाडाच्या शेंड्यावर जाऊन बसला.

जाग आल्यावर गारुड्याला आढळून आलं, की माकड दोरी तोडून पळून गेलाय्. त्यानं आधी बागेत सगळीकडं शोधलं. माकड खाली कुठं दिसेना, तेव्हा गारुडी झाडांवर पाहाणी करायला लागला. तर एका झाडाच्या शेंड्यावर सालकाची स्वारी जाऊन बसलेली त्याला दिसली. आता चुचकारल्याशिवाय तो आपल्या हाती येणार नाही, हे जाणून गारुडी त्याला समजावीत म्हणाला : " बेटा सालका, माझ्या मुलासारखा मानतो मी तुला. माझी सारी मिळकत पुढं तुझ्याच मालकीची होणार. तसं ठरवूनच टाकलंय् मी. तू मला सोडून गेलास, तर भारी दुःख होईल मला. चल, शहाण्यासारखा खाली उतर पाहू ! आपण घरी जाऊ. तिथं तुला मी पोटभर खाऊ देईन."

पण आता सावध झालेला सालक त्याच्या गोडगोड बोलण्यानं फसला नाही. तो झाडावरूनच बोलला : " गारुडीबाबा, तुमच्या ढोंगी बोलण्यानं भुलून जाण्याएवढा मूर्ख नाही मी. सकाळी तुम्ही माझ्या अंगावर मारलेले काठीचे फटके विसरता येण्यासारखे नाहीत म्हटलं.

अजून अंग ठणकतंय्. तुझी मिळकत म्हणशील तर ती तुलाच लखलाभ होवो! मला तिचा लोभ नाही. रानात मोकळेपणानं खेळणं-बागडणं यातच माझी खुषी आहे. आता काही मी तुझ्या हाती लागत नाही हे पक्कं समज अन् तू मुकाटयानं आपल्या घरची वाट धर. तू केवढंही आमिष दाखवलंस, तरी पुन्हा मिळालेलं स्वातंत्र्य गमावण्याचा मूर्खपणा मी करणार नाही."

आणि सालक या झाडावरून त्या झाडावर अशा उड्या मारीत रानात सटकला.

वरमलेला गारुडी आंबट तोंडानं आपल्या घरी निघून गेला. यःकश्चित् माकडानं फजिती केल्यानं तो पार खट्टू झाला होता.

(जातककथेवरून)


## १२ यमादेवी

नगर जिल्ह्यातील राशिन या गावी यमादेवीचं मंदिर आहे. हिची कथा—

देव-दैत्यांच्या युद्धात या देवीनं दैत्यांचा वध करून त्यांना यमलोकाला पाठवलं. म्हणून या देवीला यमादेवी हे नाव पडलं; आणि तिनं ठार मारलेल्या असंख्य दैत्यांच्या प्रेतांच्या राशी ज्या गावात पडल्या, त्या गावाला त्यावरून राशिन हे नाव मिळालं.

यमादेवीच्या मंदिराच्या बांधकामाचं वैशिष्टय हे आहे की, त्यासाठी व शिल्पकामासाठी फक्त पाषाणाचा वापर केलाय्. लाकडाचा उपयोग जरासुद्धा केलेला नाही. देवी स्वयंभू म्हणून मूर्तीऐवजी तांदळाच स्थापलेला दिसतो. नवरात्रात अष्टमीला इथं यात्रा भरते. त्यावेळी मातीच्या घडयात खण, नारळ, बांगडया, हळद, कुंकू असं ओटीचं सामान भरतात; आणि त्यावर सरकी पसरून ते पेटवून देतात. याला म्हणतात 'भंदे'. हा पेटलेला घडा घेऊन पुजारी मंदिराला प्रदक्षिणा घालतो.

# १३ घमेंडीचे फळ



फार पूर्वीच्या काळी वाराणसी नगरीत एक ब्राह्मण राहायचा. त्याला आपल्या ज्ञानाची, विद्वत्तेची भारी घमेंड. ज्यानेत्याने आपल्याला मान द्यावा, असे त्याला वाटे. पण त्या उद्धट वृत्तीच्या घमेंडखोर ब्राह्मणाला फारसा कुणी मान देत नसे.

एके दिवशी तो बाजारपेठेतून चालला होता. तर एक उन्मत्त मेंढा समोरून आला. ब्राह्मणाला पाहून त्याने मुसंडी मारण्याच्या तयारीने डोके खाली वाकवले. ब्राह्मणाला वाटले, की तो मान लववून आपल्याला अभिवादन करीत आहे. म्हणून तो घमेंडीने उद्‌गारला : "लोकहो, या मुक्या जनावरालाही मला मान देण्याची अक्कल असलेली दिसते. माणसां-पेक्षा हाच अधिक शहाणा आहे, असं म्हणायला हवं."

ब्राह्मणाचे ते उद्‌गार बाजूच्या एका दुकानदाराने ऐकले. तेव्हा तो ब्राह्मणाला सावध करीत म्हणाला : "भटजीमहाराज, भलती समजूत करून घेऊन हुरळून जाऊ नका. तुमच्यावर मुसंडी मारायच्या तयारीनं मेंढ्यानं आपली मान वाकवलीय्. तुम्हाला अभिवादन करण्या-

साठी नव्हे. उगाच खोटा ग्रह करून न घेता बाजूला व्हा. नाहीतर जिवावर बेतेल तुमच्या."

पण आपल्याच घमेंडीत, त्या मेंढ्याला आशीर्वाद देण्याच्या पवित्र्यात ब्राह्मण जागच्या जागी स्वस्थ उभा राहिला: तर मुसंडीचा पवित्रा घेतलेल्या मेंढ्याने आपली ताकद एकवटून ब्राह्मणाच्या अंगावर बेधडक मुसंडी मारली. त्याबरोबर ब्राह्मणमहाशय उडाले ते रस्त्याच्या बाजूला, थेट गटारात धाडकन् जाऊन पडले. ते चांगलेच जायबंदी झाले होते. मिजास पुरती जिरली होती.

## १४ कावळ्याचा बडेजाव

फार पूर्वीच्या काळी, आपल्या जहाजावर कावळा पाळण्याची भारतीय नावाड्यांची वहिवाट होती. या कावळ्याला म्हणत 'दिशा-काक.' अफाट समुद्रावर जहाज वाऱ्यावर कुठे भरकटत गेले, तर जमिनीचा शोध घेण्यासाठी जहाजावरचे नावाडी त्या कावळ्याला हवेत सोडून देत. आभाळात उंच जाऊन, जमिनीची टेहळणी करून, त्या दिशेने उडत जायची कावळ्याची प्रवृत्ती असते. तेव्हा कावळा जाईल त्या दिशेने जहाज हाकारायचे आणि अखेर किनारा, जमीन गाठून गोंधळातून निभावून जायचे, अशी नावाड्यांची हिकमत चाले.

तर, त्या काळी असाच एक दिशाकाक बरोबर असलेले एक भारतीय व्यापारी जहाज बावेरू नावाच्या देशाला प्रथमच जाऊन पोचले. गंमत अशी की, त्या देशात कसल्याच जातीचा एकही पक्षी नव्हता. त्यामुळे भारतीय जहाजावरचा तो कावळा पाहून तिथल्या लोकांना नवल वाटले. 'सुंदर पक्षी' म्हणून यःकश्चित कावळ्याची ते लोक मारे वाखाणणी करू लागले. 'हा पक्षी आम्हाला द्या' म्हणून ते लोक आग्रह धरून बसले.

पण 'हा पक्षी आम्हाला फार उपयोगी पडणारा असतो. देता

नाही येणार', असे नावाडी म्हणाले. लोकांनी जास्तजास्त पैसे देऊ केले. तरीही नावाडी बधेनात. शेवटी तब्बल शंभर मोहरा (त्या वेळची कार्षापण नाणी) देण्यापर्यंत त्यांची मजल गेली. तेव्हा, भारतात मागाहून हवेतेवढे कावळे मिळतील, एवढी रक्कम का सोडा, म्हणून नावाड्यांनी तो कावळा शेवटी बावेरूच्या लोकांना विकून टाकला.

बावेरूत कसलेच पाखरू बघायला मिळत नसल्याने तिथल्या लोकांना कावळ्याचे खूप कौतुक वाटले. त्याच्यासाठी साधासुधा नाही, तर चक्क सोन्याचा पिंजरा बनवला त्यांनी. त्याच्या खाण्यापिण्याचीही चंगळ झाली. एकूण, त्या देशात त्या एकमेव पक्ष्याचा– कावळ्याचा बडेजाव खूपच वाढला. देशभरचे लोक तो 'अद्‌भुत पक्षी' पाहायला येऊ लागले.

बावेरू देशात पक्ष्यांची वाण असलेली पाहून, त्या भारतीय नावाड्यांनी तिकडे पक्षी विकून चांगली कमाई होईल हे जाणलं. आणि म्हणून दुसऱ्या खेपेला ते तिकडे मोरच घेऊन गेले. मोरासारखा अपूर्व नयनमनोहर पक्षी पाहून तर बावेरूवासी लोक थक्कच झाले. तो विकत घेण्याची तिथल्या श्रीमंत मंडळींत चढाओढच लागली. नावाड्यांनीही मोराची किंमत भरमसाट वाढवून सांगितली. तरीसुद्धा त्यांनी सांगितलेली हजार मोहरा ही किंमत देऊन एका श्रीमंत बावेरू माणसाने तो मोर खुशाल खरेदी केला.

आता कुठे यःकश्चित् काळपट कावळा अन् कुठे रंगीबेरंगी पिसांचा पिसारा फुलवणारा राजबिंडा पक्षी मोर! कावळ्याची नवलाई संपली! साहजिकच ते पहिले लोक कावळ्याला मोरापुढं तुच्छ लेखू लागले. मोराच्या तुलनेने अत्यंत क्षुद्र वाटणाऱ्या त्या कावळ्याची त्यांनी सोन्याच्या पिंजऱ्यातून उचलबांगडी केली अन् दिले त्याला हाकलून!

मोराचा बडेजाव कमालीचा वाढला. अर्थात् तो त्याला साजेसाच होता. कावळा मात्र पिंजऱ्यातून हाकलून देताच, आपल्या खऱ्या स्वभावाला धरून उकीरड्यावरचे गलिच्छ पदार्थ खाऊ लागला. ते पाहून लोक त्याची लायकी ओळखून चुकले.


# १५ नकारात होकार

एका गृहस्थाला दोन मुलगे होते. एकदा बापाने दोघांनाही जवळ बोलावून घेतले आणि काहीएक काम करायला सांगितले. थोरल्याने मान डोलावीत लगेच सांगून टाकले : “ करून टाकीन. त्यात काय ?” त्या मुलाचा आज्ञाधारकपणा व उत्साह पाहून बापाला आनंद वाटला.


धाकटा मुलगा मात्र नाखूष दिसला. गुळमुळीत न बोलता त्याने बापाला स्पष्टच सांगून टाकले : “ मी काही हे काम करणार नाही.” आपले सांगणे बेधडक उडवून लावणाऱ्या त्या मुलाबद्दल बापाला खेद वाटला. पण त्यावर काही न बोलता तो गप्पच राहिला.

पण गंमत अशी झाली की, आपण काम करून टाकू असे बापाला उत्साहाने वचन देणाऱ्या त्या थोरल्या मुलाने ते काम काही केले नाही. त्याबद्दल तो बेफिकीरच राहिला. मात्र धाकट्या मुलाने बापाला त्याच्या तोंडावर नकार दिला होता, तरीसुद्धा ते काम मुकाट्याने करून टाकले होते.

म्हणजे...केवळ वेळ मारून नेण्यासाठी तोंडदेखले कोरडे वचन देणाऱ्या मुलापेक्षा, प्रथम नकार देऊन का होईना, पण अगत्याने गुपचूप काम करणारा धाकटा मुलगाच शेवटी बापाचा आज्ञाधारक मुलगा ठरला ! कोरडं वचन द्यायला काय जातं ? प्रत्यक्ष कृतीच खरी महत्त्वाची.



# १६ भलत्याला उपदेश



एकदा हिमालयाच्या भागात एक वानर पावसात सचैल भिजल्यानं थंडीनं कुडकुडत एका झाडाखाली बसला होता. त्याच झाडावर एका घरट्यात एक पक्षी राहत होता. कुडकुडणाऱ्या वानराला बघून त्यानं म्हटलं, "अरे, आम्ही केवळ चोचीनं घरटं बांधतो. तुला तर माणसासारखे हात-पाय आहेत. डोकं आहे. असं असताना राहायला घरकुल का बांधत नाहीस तू ? बांधलं असतंस तर उघड्यावर अशी कुडकुडत बसण्याची पाळी आली नसती तुझ्यावर."

"माणसासारखे हातपाय आहेत मला, पण..." वानर कुरकुरला, "पण माणसासारखी कामगिरी आम्हाला कुठली जमायला ? आमचं डोकं तेवढं नाही काम करत."

"त्याचं काय आहे;" पक्षी बोलला, "ज्याचं मन चंचल असतं, जो दुसऱ्याच्या कुचेष्टा करण्यात वेळ दवडतो, त्याच्या हातून विधायक

स्वरूपाचं काम होत नाही. यासाठीच दुसऱ्याला त्रास देण्याची प्रवृत्ती तू सोडून द्यायला हवीस. मग जिद्दीनं, चिकाटीनं स्वतःच्या निवाऱ्यासाठी घरकुल बांधता येईल तुला."

उपदेश ऐकायची सवय नसलेल्या वानराला आला वैताग. तो चिडून, दात विचकीत बोलला– "घरट्यात बसून मारे उपदेश करायला काय जातं तुझं? तू समजतोस कोण स्वतःला? थांब, माझा इंगाच दाखवतो तुला."

आणि झरझर झाडावर चढून त्या वानरानं पक्ष्याचं घरटंच विस्कटून टाकलं.

दुष्ट स्वभावाच्या मूर्खाला आपण उपदेश करीत बसलो, म्हणून हा प्रसंग आपल्यावर ओढवला, हे तो पक्षी जाणून चुकला आणि 'स्वतःचं घर करवत नाही, अन् दुसऱ्यानं बनवलेलं बघवत नाही.' असं मनाशी म्हणत तो पक्षी दूर उडून गेला. (जातककथेवरून)

## १७ सावित्रीची गोष्ट

पूर्वीच्या काळी भद्रदेशात अश्वपती नावाचा धर्मपरायण व प्रजेचं तत्परतेने पालन करणारा राजा होता. दुःखाची एकच गोष्ट म्हणजे त्याला मूल नव्हतं. तर त्यानं ब्रह्मदेवाची पत्नी सावित्री हिची दीर्घकाळ आराधना केली. शेवटी सावित्री प्रसन्न झाली आणि "तुला गुणसंपन्न, तेजस्वी अशी कन्या होईल." असा वर तिनं राजाला दिला.

वराप्रमाणे राजाला कन्या झाली. सावित्रीच्या कृपेचा हा प्रसाद म्हणून राजानं सावित्री असंच कन्येचं नाव ठेवलं.

सावित्री लग्नाची झाली, तेव्हा शाल्व देशाचा राजा द्युमत्सेन याचा पुत्र सत्यवान याला तिने आपला नवरा म्हणून निवडले. स्वतः द्युमत्सेन अंध होता. शिवाय त्याच्या शत्रूंनी त्याला पदभ्रष्ट केल्यामुळे आपली पत्नी व पुत्र सत्यवान यांच्यासह अरण्यात राहून दिवस कंठीत होता.

सावित्रीने नवरा म्हणून सत्यवानाला पसंत केल्याची वार्ता नारदाला कळताच त्याला भारी वाईट वाटले. कारण सत्यवानाचे आयुष्य आणखी केवळ वर्षभरच आहे, हे तो जाणून होता. त्यानं तातडीनं अश्वपतीची भेट घेतली व ही गोष्ट त्याच्या नजरेस आणली. पण सत्यवान अल्पायुषी ठरणार असला, तरी आपण त्याच्याशीच लग्न करणार, असा निर्धार सावित्रीने व्यक्त केला. तेव्हा नाइलाजाने, तिला आशीर्वाद देऊन नारद निघून गेला.

मग सत्यवानाशी सावित्रीचा रीतसर विवाह झाला. उंची वस्त्रे व सुवर्णालंकार दूर सारून सावित्री साधेपणाने नवऱ्याची व सासू-सासऱ्याची सेवा करीत अरण्यात राहू लागली.

शेवटी सत्यवानाचा मृत्यू चार दिवसांवर येऊन ठेपला. सावित्रीने तीन दिवसांच्या उपवासाचे सावित्रीव्रत आरंभले. व्रताचे तीन दिवस उलटले. चौथा– सत्यवानाच्या मृत्यूचा दिवस. सत्यवान नेहमीप्रमाणे लाकडे तोडून आणायला गेला. तर यावेळी सावित्रीही त्याच्याबरोबर गेली.

लाकडे तोडता तोडता सत्यवानाला घेरी आली व तो सावित्रीच्या मांडीवर डोके टेकून पडून राहिला. तोच खुद्द यमधर्म तिथे आला आणि त्याचे प्राण ओढून नेऊ लागला. तेव्हा यमधर्माच्या मागून सावित्रीही जाऊ लागली. माघारी फिरण्याबद्दल यमाने तिला खूप सांगून पाहिले, पण पतिव्रताधर्माला जागून आपण नवऱ्यामागून जातो आहोत, असे म्हणून ती चिकाटीने यमामागून जात राहिली. तिने माघारी वळावे म्हणून यमाने तिला काही वर दिले. त्यानुसार तिने सासऱ्याला दृष्टिलाभ व्हावा, त्याचे राज्य त्याला परत मिळावे, आपल्याला पुत्र लाभावेत या मागण्या मान्य करून घेतल्या. शेवटची मागणी मान्य करताना यमाची गफलत झाली. कारण ती पूर्ण व्हायची म्हणजे सत्यवान पुन्हा जिवंत होणे अपरिहार्य होते. शेवटी सत्यवानाचे प्राण त्याने परत केले.

घरी परतल्यावर सावित्रीने व्रत विधिपूर्वक पूर्ण केलें.

भारतात सावित्री ही आदर्श पतिव्रता गणली गेली आहे. ती अखंड सौभाग्याचे प्रतीक मानली गेलेली आहे.

## १८ माणुसकीचं दर्शन

जीवन-मरणाचा प्रसंग ओढवला असतानाही कधीकधी एखाद्या माणसाच्या माणुसकीचं दर्शन कसं घडतं ते सांगणारी ही एक गोष्ट—

सर सिडनें हा थोर लढवय्या एकदा एका लढाईत घायाळ होऊन पडला होता: केव्हाही मरण ओढवेल अशी दुर्दैवी स्थिती होती त्याची: अशावेळी त्याला शोधत एक लष्करी अधिकारी त्याच्यापाशी आला. सिडनेला बोलणेही अशक्य झाले होते. म्हणून त्याने खुणेनेच त्या अधिकाऱ्याला पिण्यासाठी पाणी आणायला सांगितले.

तो अधिकारी कुठूनतरी पाणी घेऊन आला. एवढ्यात सिडनेच्या बाजूलाच घायाळ होऊन पडलेल्या एका शिपायाने काकुळतीला येऊन त्या पाण्याकडे पाहिले आणि तो पाण्याच्या आशेने, कोरड्या पडलेल्या घशातून कण्हत आवंढे गिळू लागला: सिडनेची नजर त्याच्याकडे गेली. ती शिपायाची ती अवस्था पाहून सिडनेचे काळीज गलबलले. आणलेले ते पाणी आधी त्या शिपायाला द्यायला त्याने त्या अधिकाऱ्याला खुणेनेच सांगितले.

त्याप्रमाणे अधिकाऱ्याने ते पाणी त्या शिपायाच्या घशात ओतले. पाणी प्यायला मिळताच त्या शिपायाच्या चेहऱ्यावर तरळून गेलेलें समाधान पाहून सिडनेला, त्याच्या मरणोन्मुख स्थितीतही खूप बरे वाटले.

आता सिडनेसाठी म्हणून पुन्हा पाणी आणायला तो अधिकारी धावतपळतच गेला, पण तो पाणी घेऊन येईपर्यंत सिडनेच्या प्राणांची ज्योत मालवलेली होती. त्याच्या चेहऱ्यावर मात्र समाधान तरळत असलेले त्या अधिकाऱ्याला दिसले.



7044 22/2/54
वा.वा.

## १९ खोटा स्वयंपाकी

एका जमीनदाराकडे एक माणूस स्वयंपाकी म्हणून लागला. जमीनदाराला माणूस खूप भोळा असावा असे वाटले. जमीनदाराने त्याला अनेक प्रश्न विचारून त्याच्याकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. माहिती पुरेशी न मिळाल्याने तो नेहमी शंकित राहिला. शेवटी याने स्वयंपाक्याला विचारले, तुम्ही सांगता, बऱ्याच ठिकाणी स्वयंपाक केला आहे तर प्रत्येक ठिकाणची नोकरी सुटण्याची काय कारणे ? तुम्ही नेहमी गैरहजर राहात होता का ?

" स्वयंपाकी आणि तोसुद्धा नेहमी गैरहजर राहिला तर घरच्यांना किती त्रास सोसावा लागेल हो ?"

" स्वयंपाक करताना कसा झाला हे चाखून पाहात सर्व पदार्थच संपवून टाकत असाल, अशी काही वाईट सवय असेल ?" जमीनदाराने विचारले.

" स्वयंपाक करताना किती खाऊ शकेन ? आणि घरातल्या सर्वांनी खाऊन जे उरते ते खातोच की. "

" स्वयंपाकाला लागणारे सामान चोरण्याची सवय असेल ?" जमीनदाराने विचारले.

" जेव्हा सर्व स्वयंपाकघर माझ्याच ताब्यात असते तर मी असे का करीन ?"

" सर्व ठिकाणची कामे तुम्ही सोडून का दिलीत ?" जमीनदाराने खोचून विचारले.

" माझे मन स्थिर राहत नाही, मी जेव्हा तेव्हा विसरून जातो की, मी एक स्वयंपाकी आहे आणि मग बागकाम किंवा घोड्याचा खरारा करण्याकरिता निघून जातो. तेव्हा ह्या कारणांनी माझी नोकरी नेहमी सुटते. " स्वयंपाक्याने उत्तर दिले.

## २० रुक्मिणीशी लग्न

विदर्भ देशाचा राजा भीष्मक याची मुलगी रुक्मिणी हिने श्रीकृष्णाशी लग्न करायचे मनात ठरविले होते. तिच्या भावाला हे पसंत नव्हते. त्याने शिशुपाल नावाच्या राजाशी रुक्मिणीचे लग्न ठरविले.

रुक्मिणीने विचार करून श्रीकृष्णाला पत्र लिहिले. एका विश्वासू ब्राह्मणाबरोबर तिने हे पत्र श्रीकृष्णाला पाठविले.

श्रीकृष्णाने ते पत्र वाचले. रुक्मिणीचे आपल्यावरील प्रेम पाहून श्रीकृष्ण गहिवरला. त्याने उलट निरोप पाठविला की, "तू काळजी करू नकोस. मी तुला घेऊन जाईन."

रुक्मिणी देवीच्या दर्शनाला मंदिरात गेली. तिने हात जोडले. डोळे मिटून देवीची प्रार्थना केली. दर्शन घेऊन ती बाहेर आली. इतक्यात श्रीकृष्णाने तिचा हात धरून तिला आपल्या रथात बसविले. रथ भरधाव निघाला, द्वारकेला पोहोचला.


द्वारकेत श्रीकृष्णाचा थाटाने रुक्मिणीबरोबर विवाह झाला.

---

## २१ अग्निदेवता

अग्नी ही देवता सर्वांत श्रेष्ठ अशी पृथ्वीवरील संस्कारदेवता मानलेली आहे. तिचा मुख्य संबंध यज्ञाशी. तुपाची पाठ, ज्वालांचे केश, तपकिरी दाढी, तीक्ष्ण जबडे व सोन्याचे चकचकीत दात अशी ही अग्नीदेवता आहे. माणसांच्या घराशी या देवतेचा सर्वांत जवळचा संबंध असून अग्नीला गृहपती असे म्हटलेले आहे. यज्ञात पुढील भागीच स्थापन केलेला, पेटलेला, देवांना (यज्ञासाठी) बोलविणारा ऋत्विज आणि ऐश्वर्याने संपन्न अशी अग्नीची स्तुती वेदात केलेली आहे.

# २२ चाणाक्ष साक्षीदार



जुन्या काळची गोष्ट. एका गावच्या कोतवालानं गावच्या बेलदाराचा घोडा एके दिवशी रातोरात पळवून नेला. त्या घोड्याची शेपटी कापून आखूड केली अन् घोडा आपल्या गोठ्यात बांधला. बाहेरगावच्या आपल्या एका सोयऱ्यानं तो घोडा आपल्याला दिला, असं तो कोतवाल ज्याला त्याला सांगू लागला. पण बेलदारानं पक्कं ओळखलं, की, कोतवालानं त्याच्या गोठ्यात नेऊन बांधलेला घोडा आपलाच आहे. पण गावच्या कोतवालाशी तंटा करून भागणार नाही; त्यापेक्षा थेट राजाकडं दाद मागावी असं त्यानं ठरवलं. लगेच त्याने राजाकडे आपलं गाऱ्हाणं नेलं.

राजानं बेलदाराला नि कोतवालाला बोलावून घेतलं. प्रथम त्यानं बेलदाराला विचारलं : "तो घोडा तुझाच आहे हे सांगणारा कुणी साक्षीदार आहे का ?"

बेलदार बोलला, की, त्याच्या शेजारचा दुकानदार त्याच्या घोड्याला चांगलं ओळखतो. तो बाहेर उभा आहे.

तेवढ्यात कोतवाल मधेच म्हणाला, "बेलदाराच्या घोड्याचं शेपूट चांगलं लांब होतं हे गावचे सारेजण जाणतात. आणि माझ्या घोड्याचं शेपूट तर खूपच आखूड आहे."

कोतवालाला अडवून राजानं त्याला खोचक सवाल केला—

“बेलदाराच्या घोडयाचं शेपूट लांब होतं असं म्हणताय्, म्हणजे आता ते लांब नाही, असं म्हणायचंय् का ?”

“अं...अं...” कोतवाल गोंधळून चाचरला, “न– नाही. तसं नाही म्हणायचं मला. त्याचा घोडा लांब शेपटाचा असल्याचं नजरेस आणायचं एवढाच माझ्या बोलण्याचा मतलब.”

“अस्सं...!” गोंधळलेल्या कोतवालाकडं रोखून पाहत राजा उद्गारला.

राजानं साक्षीदार म्हणून त्या दुकानदाराला आत बोलावून घेतलं. आता कोतवाल ही गावची वजनदार अधिकारी असामी. आणि बेलदार तर त्याच्या घोड्यावरून आपल्या मालाची नेहमी ने-आण करणारा. म्हणजे दोघांपैकी एकजणालाही दुखवून भागण्यासारखं नव्हतं. कोतवालाकडचा घोडा बेलदाराचाच आहे हे त्या दुकानदारानं ओळखलं होतं. साक्षीदार म्हणून खरं ते सांगणं हेही त्याचं कर्तव्य होतं. पण रोखठोक खरं सांगितलं तर कोतवाल त्याच्यावर बिथरणार होता. नि पुढंमागं त्याचं उट्टं काढल्यावाचून राहणार नव्हता. अशा विचारानं, राजाच्या प्रश्नाला उत्तर न देता दुकानदार, आळीपाळीनं कोतवाल, बेलदार नि राजाकडं पाहत गप्पच उभा राहिला.

दुकानदार बराच वेळ या प्रकरणी काहीच बोलेनासं पाहून राजा वैतागला. शेवटी त्याला खडसावून राजा म्हणाला : “हे बघ, उगाच वेळ वाया दवडू नकोस. सध्या कोतवालाकडं असलेला घोडा या बेलदाराचा का ? तुझं काय म्हणणं असेल ते लगेच सांगून टाक.”

तेव्हा मग नाइलाजानं दुकानदार, हिकमत लढवीत बोलला : “महाराज, घोडा माझ्या चांगल्या ओळखीचा तर दिसतो. समोरून तो बेलदाराचा घोडा स्पष्ट दिसतो. पण पाठीमागनं पाहिलं, तर बेलदाराच्या घोड्याला नसलेलं आखूड शेपूट नजरेस पडतं. अशा स्थितीत मी काय सांगावं ? घोडा कुणाचा ते महाराजांनीच ठरवावं म्हणजे झालं !”

कोतवालाच्या धाकानं स्पष्टपणे नि उघडपणे बोलायला दुकानदार

कचरत असला पाहिजे, हे त्याच्या हावभावांवरून अन् डोळ्यांच्या हालचालीवरून राजानं ओळखलं. पण त्याच्या सूचक बोलण्यावरून राजा काय समजायचं ते समजून चुकला होता. घोड्याला ओळखायचं ते समोरून पाहूनच. तेव्हा राजानं निष्कर्ष काढला, की, कोतवालानं बेलदाराचा घोडा चोरला असून तो वेगळा दिसावा म्हणून त्याचं शेपूट कापलेलं आहे. कोतवालाचं मघाचं बोलणं नि गोंधळून चाचरणं यावरून त्याला शंका आलीच होती. अर्थात बेलदाराचा घोडा त्याला परत देण्याचा हुकूम देऊन कोतवालाला त्यानं बडतर्फ केलं.

## २३ एकबुद्धी बेडूक

एका तलावात शतबुद्धी आणि सहस्रबुद्धी या नावाचे दोन मासे राहात असत. त्यांची एकबुद्धी नावाच्या बेडकाशी मैत्री जमली. ते तिघेही तलावाच्या किनाऱ्यावर थोडा वेळ एकत्र जमत आणि सुभाषित व कथा सांगून पुन्हा पाण्यात जात असत, एकदा संध्याकाळी ते तिघे बोलत बसले असता काही कोळी तेथे आले. त्यांच्या हातांत जाळी होती आणि डोक्यावर पुष्कळसे मारलेले मासे होते. त्यांनी तो तलाव पाहिला आणि म्हणाले, “ वाहवा ! या तलावात खूपच मासे आहेत. आणि पाणीही खोल आहे. तेव्हा उद्या सकाळी आपण येथे येऊ या.” असे बोलून ते घरी गेले.

त्यांचे बोलणे ऐकून माशांची तोंडे उतरली आणि ते विचार करू लागले. बेडूक म्हणाला, “ अरे शतबुद्धी, हे कोळी काय बोलले ते ऐकलेस ना ? तेव्हा आता काय केले पाहिजे ? पळून जावे, की धैर्याने येथेच राहावे ? जे योग्य असेल तसा आदेश दे.”

ते ऐकून सहस्रबुद्धी हसून म्हणाला, “ मित्रा, भिऊ नकोस. त्यांचे केवळ बोलणे ऐकूनच त्यांना भिऊ नये. म्हणतातच की, साप आणि दुष्ट अंतःकरणाचे लोक यांच्या मनातील हेतू नेहमीच सफल होत नाहीत.

म्हणून तर हे जग चालले आहे. ते कोळी कदाचित इकडे यायचेही नाहीत. आणि जर आलेच तर मी माझ्या बुद्धिप्रभावामुळे माझा व तुझा प्राण वाचवीन. कारण, पाण्यात संचार करण्याच्या अनेक युक्त्या मला माहीत आहेत."

"तू योग्यच बोललास." शतबुद्धी म्हणाला, "तुझे नावच मुळी सहस्रबुद्धी. म्हणतातच की, या जगात बुद्धिमान लोकांना समजणार नाही आणि अवघड वाटेल असे काही नाही."

"शस्त्रधारी नंदराजाला एकट्या चाणक्याने आपल्या बुद्धीच्या बळानेच नष्ट केले. शिवाय जेथे वारा आणि सूर्यकिरणेही शिरू शकत नाहीत, तेथे बुद्धिमंताची बुद्धी प्रवेश करू शकते. म्हणून कोणाचे तरी बोलणे ऐकून आपले वाडवडिलांपासून चालत आलेले स्थळ सोडून देणे योग्य नाही. म्हणतातच की, ज्या ठिकाणी आपला जन्म झाला असेल ते स्थान वाईट असले, तरी तेथे जे सुख मिळते ते अप्सरा राहात असलेल्या स्वर्गातही मिळत नाही ! तेव्हा कोठेही जायचे कारण नाही. मी तुझे माझ्या बुद्धिसामर्थ्याने रक्षण करीन."

बेडूक म्हणाला, "मित्रांनो, मला एकच बुद्धी आहे; आणि ती मला पळून जायला सुचवत आहे ! त्यानुसार मी माझ्या पत्नीसह आत्ताच दुसऱ्या तलावात जातो." असे म्हणून तो बेडूक रात्रीच दुसऱ्या तलावात गेला.

सकाळी कोळी आले. आणि त्यांनी पाण्यातील सर्व लहान-मोठे प्राणी, मासे, कासव, बेडूक, खेकडे अशा सर्वांना पकडले.


शतबुद्धी आणि सहस्रबुद्धी आपल्या पत्नीसह पळून जाऊ लागले. पाण्यात संचार करणाऱ्या अनेक युक्त्या माहीत असल्याने त्यांनी पुष्कळ वेळ लपून राहून आपले रक्षण केले. पण शेवटी तेही जाळ्यात सापडून मारले गेले.

दुपारच्या वेळी संतुष्ट झालेले कोळी घराकडे निघाले. शतबुद्धी जड असल्याने एका कोळ्याने त्याला खांद्यावर टाकले होते आणि सहस्रबुद्धी लोंबकळत होता. एका विहिरीच्या काठावर बसलेल्या एक-

बुद्धी बेडकाने त्यांना नेत असताना पाहिले आणि तो आपल्या बायकोला म्हणाला, "प्रिये पाहा, हा शतबुद्धी डोक्यावर बसला आहे आणि सहस्रबुद्धी लोंबकळत आहे ! मी एकबुद्धी असूनही स्वच्छ पाण्यात खेळत आहे !"

## २४ चतुर तेन्नालीराम


तेन्नालीराम विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याच्या पदरी असताना राजाची म्हातारी आई आजारी पडली. तेव्हा तिला आंबा खावासा वाटला. राजानं सेवकांना आंबे आणायला पाठवलं, पण दुर्दैवानं आंबे आणण्यापूर्वीच ती मरण पावली. राजाला या गोष्टीचं भारी वाईट वाटलं. आईची शेवटची इच्छा अपुरी राहिली याची भरपाई म्हणून आता काय करावे, असे त्याने ब्राह्मणांना बोलावून विचारले. ब्राह्मणांनी सांगितलं की, सोन्याचे आंबे बनवून ते ब्राह्मणांना दान करावेत. राजानं त्याप्रमाणे केलं. ब्राह्मणांच्या या स्वार्थीपणाची तेन्नालीरामला चीड आली. म्हणून त्यांची खोडकी जिरवण्याचं त्यानं योजलं.



राजाकडून सोन्याचे आंबे लुबाडणाऱ्या साऱ्या ब्राह्मणांना एके दिवशी त्यानं आपल्या आईच्या इच्छापूर्तीसाठी म्हणून आपल्या घरी बोलावलं. काहीतरी दान मिळेल या आशेने सारेजण तत्परतेने आले. त्यांना इथं दान मिळालं, पण ते सांडसाच्या डागांच्या स्वरूपात. रडत-ओरडत त्यांनी राजाकडं गाऱ्हाणं नेलं. या अमानुष कृत्याबद्दल राजानं तेन्नालीरामला जाब विचारला. तेन्नालीराम या प्रसंगाचीच वाट पाहत होता. त्यानं खुलासा केला—

" महाराज, माझी आई मरायला टेकली, तेव्हा तिच्या हातापायांना झटके येत होते. त्यावर उपाय म्हणून वैद्यानं डागण्या द्यायला सुचवलं होतं. त्याप्रमाणे डाग द्यायला आईनंही मला सांगितलं, पण डाग देण्यापूर्वीच ती मरण पावली. तुमच्या आईची शेवटची इच्छा या ब्राह्मणांना सोन्याचे आंबे देऊन तुम्ही पुरी केलीत, तर म्हटलं याच ब्राह्मणांना डाग देऊन माझ्या आईची शेवटची इच्छा पूर्ण करावी. तुम्हाला यांनी सोन्याचे आंबे आपणाला दान करायला सांगितलं. तसे मी खरं तर सोन्याच्या सांडशीनं डाग द्यायला हवे होते, पण मी गरीब असल्यानं लोखंडी सांडशीवर भागवावं लागलं मला. "

तेन्नालीरामचा तो चतुर युक्तिवाद ऐकून कृष्णदेवराय तर खूष झालाच, पण गाऱ्हाणं घेऊन येणारे ते लबाड ब्राह्मण, आपलाच डाव आपल्याच अंगाशी आलेला पाहून राजापुढून मुकाट सटकले.



## २५ तिबेटी रामायण

भारताबाहेरच्या इतर काही देशांप्रमाणे तिबेटमधेही 'रामायण' या रामकथेचा प्रसार झाला. तिथं रामकथा पोचवली बौद्धांनी. कारण तिकडे बौद्धधर्म प्रचलित आहे. इसवीसनाच्या आठव्या किंवा नवव्या शतकातल्या, तिबेटी स्वरूपाच्या रामायणाच्या बऱ्याच हस्तलिखित प्रती मिळालेल्या आहेत. मात्र वाल्मिकीरामायणाच्या कथेत काही फेरबदल केलेले तिबेटी रामायणात आढळून येतात. त्यांतले काही फेरबदल असे–

सीता ही त्यात रावणाच्या पट्टराणीची कन्या दाखवली आहे आणि तिच्या जन्मकुंडलीत पित्याला अनिष्टयोग दर्शवण्यात आलेला पाहून रावणानं तिला चक्क समुद्रात फेकून देऊन तिचा काटा काढला.

दशरथाला दोन राण्या होत्या व त्यांतल्या धाकटच्या राणीच्या पोटी भगवान विष्णूनं जन्म घेतला, असं म्हटलं असून त्या मुलाचं नाव रामन असं दिलंय. तर थोरल्या राणीला मुलगा झाला त्याचं नाव लक्ष्मण असल्याचं सांगितलंय. विष्णुपुत्रानं लक्ष्मणाच्या रूपानं जन्म घेतल्याचाही उल्लेख आहे.

आपल्यामागे दोघांपैकी कोणत्या मुलाकडं राज्य सोपवावं, असा प्रश्न दशरथाला पडला. तेव्हा रामनने पित्याला सांगून लक्ष्मणाला राज्याभिषेक करायला लावला. एवढंच नव्हे, तर स्वतः रामन तप करायला म्हणून वनात निघून गेला.

रावणानं समुद्रात फेकून दिलेल्या सीतेला दुसऱ्या किनाऱ्यावरच्या अरण्यालगतच्या काही शेतकऱ्यांनी वर काढून वाचवलं होतं. त्यांनी तिचे नाव ठेवले होते लीलावती. ती आता मोठी झाली होती. तर त्याच अरण्यात आलेल्या रामननं तिच्याशी लग्न करावं, असा त्या शेतकऱ्यांनी आग्रह केला. रामनने त्यांची विनंती मानून तिला पत्नी म्हणून स्वीकारले आणि मग तिच्यासह तो अयोध्येला गेला व राजा बनला.

रावण सीतेला पळवून नेतो, पण तिच्या विरोधामुळे तो तिच्या अंगाला स्पर्श करीत नाही, असे या रामायणात दाखवले असून सीतेचा

शोध, वानरांशी मैत्री, रावणाशी युद्ध व त्याचा वध रामनने करणे वगैरे घटना मात्र बऱ्याचशा वाल्मिकीरामायणाला धरून वर्णिलेल्या दिसून येतात.

सीता परत आल्यावर, रामनला ठपका देणाऱ्या एका परिटाच्या बोलण्यावरून रामन सीतेचा त्याग करतो. परंतु लव-कुश ही जुळी मुले तिला त्याआधीच झालेली होती, असे मात्र या रामायणात दाखवलेले आहे.

गुणभद्र याचें 'उत्तरपुराण' व 'बृहत्कथा' या ग्रंथांचा प्रभाव या तिबेटी रामकथेवर पडलेला दिसतो.

## २६ निर्जला एकादशी

पांडवांतल्या भीमाची भूक दांडगी असल्याने त्याला उपवास करणे साधत नसे. त्यासाठी त्याने व्यासांना एखादे बहुफल देणारे व्रत सांगायची विनंती केली व्यास म्हणाले, "निर्जला एकादशीचे व्रत करशील, तर पुण्य, संपत्ती व पुत्रप्राप्ती होईल. मरणानंतर विष्णुलोकाला जाशील." त्याप्रमाणें भीमानें एकादशीचे एकमेव व्रत केले.

ज्येष्ठ शु० ११ : या तिथीला निर्जला एकादशी हे व्रत करतात. हिला भीमसेनी एकादशीही म्हणतात. या एकादशीचे व्रत विधीपूर्वक केले, तर वर्षातल्या सर्व एकादशीव्रताचे पुण्य लाभते, असे मानलें आहे.

या व्रतात आचमनाखेरीज पाणीसुद्धा न पिता व काहीही न खाता उपवास करायचा असतो. रात्री विष्णूमूर्तीची पूजा करून नाचगाण्यात रात्र जागवायची आणि दुसऱ्या दिवशी सकाळी विष्णूची पूजा करून ब्राह्मणभोजन घालायचे. पाण्याचा घडा, सोने, छत्र, वस्त्र व पादत्राणे दान द्यायची. दीर्घ आयुष्य व आरोग्य लाभून अखेर स्वर्गाची प्राप्ती होते, असे या व्रताचे फल सांगितले आहे.

## २७ बदरीनाथ

बदरीनाथ हे हिमालयातील प्रख्यात पुण्यक्षेत्र असून ते १०२४४ फूट उंचीवर आहे. बदरीधाम किंवा बदरीविशाला असंही याला म्हटलं जातं. पूर्वीच्या काळी इथं बोरवन होतं, म्हणून हे ठिकाण बदरी म्हणून ओळखलं जाऊ लागलं.

या क्षेत्राच्या बाजूनं अलकनंदा नदी वाहत असली, तरी या ठिकाणी तिच्या पात्रात स्नान करणं धोक्याचं आहे. म्हणून या नदीत स्नान करण्याऐवजी यात्रेकरू तप्तकुंडात स्नान करून मग बदरीनाथाच्या मंदिरात जातात.

बदरीनाथाचं मंदिर गावाच्या मध्यभागी असून बाजूच्या रस्त्यापासून ते १०–१२ फूट उंचीवर आहे. मात्र वर जाण्यासाठी चांगल्या लांबरूंद पायऱ्या आहेत.

डेरेदार उंच कळस असलेलं हे मंदिर पूर्णपणे दगडी आहे. गाभाऱ्यावरचं दुछपरी शिखर पागोडा पद्धतीचं असून ते सोन्याच्या पत्र्यानं मढवलेलं आहे.

बदरीनारायणाची मूर्ती शाळिग्राम शिळेची असून तिला सोन्याचा मुखवटा चढवलेला असतो. माथ्यावरचा मुकुटही सोन्याचा व हिरेजडित आहे.

ही मूर्ती प्राचीन असल्याचे उल्लेख पुराणात आढळतात. पण काही वेळा ती स्थानभ्रष्ट झाली होती, असं आख्यायिकांवरून दिसून येतं. त्यांतली एक आख्यायिका अशी आहे–

बौद्ध धर्माचा वाढता प्रसार होत होता, त्या काळात त्याचं लोण तिबेटात पसरलं, तर त्यावेळी दुराग्रही तिबेटी लोकांनी आक्रमण करून हे क्षेत्र उद्ध्वस्त केलं. नारायणाची मूर्ती त्यांनी बेधडक नारदकुंडात फेकून दिली. पुढं बौद्ध धर्माला शह देऊन आद्य शंकराचार्यांनी वैदिक धर्माची ध्वजा पुन्हा नेटानं फडकवली, तेव्हा त्यांनी या क्षेत्रात एक मठ स्थापन केला. तसंच नारदकुंडातली नारायणाची मूर्ती वर काढून तिथं तिची स्थापना केली.

सध्या बदरीनारायणासाठी म्हणून रोज चाळीसेक किलोंचा भात शिजवतात. दुपारच्या सुमारास आमटीसह भाताचा नैवेद्य नारायणाला दाखवल्यावर तो भात प्रसाद म्हणून यात्रेकरूंना विकतात.

बदरीनारायणापासून थोड्या मैलांवरच, अलकनंदा नदीवर केशवप्रयाग हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. त्याच्याजवळच १०५६० फूट उंचीवर माणा हे गाव आहे. त्या गावापाशी, सरस्वती नदीच्या काठावर असलेल्या बदरिकाश्रमात व्यासगुंफा म्हणून आहे. त्या ठिकाणी व्यासांनी भारत हा ग्रंथ व भागवत हे पुराण लिहिलं. आद्य शंकराचार्यांनीही आपले भाष्यग्रंथ इथंच बसून लिहिले, असं सांगतात.

तिबेटची सीमा बदरीनाथापासून थोड्या मैलांवरच सुरू होते. आता चांगली सडक झाल्यानं बदरीनाथाची यात्रा बसमधून सुलभपणे करता येते.

मार्गशीर्ष ते वैशाख या हिवाळ्याच्या दिवसांत या क्षेत्रात १०-१५ फूट उंचीचा दाट बर्फाचा थर सगळीकडं पसरतो. साहजिकच त्या काळात त्या भागात कुणी माणसं राहत नाहीत. त्यामुळं त्या मुदतीत नारायणाची उत्सवमूर्ती खालच्या जोशीमठात आणून ठेवतात. अर्थात् तिथंच तोवर तिची पूजा-अर्चा चालते. ज्येष्ठाच्या सुरुवातीला बर्फ वितळून जातं: तेव्हा मग पुन्हा ती मूर्ती बदरीनाथाला नेऊन ठेवतात. अर्थात् तेव्हापासून तिथली यात्रा सुरू होते.

---

## २८ वरुणदेवता

वरुण ही आर्यांची इन्द्राइतकीच महत्त्वाची देवता. विश्वाचा राजा असे त्याला म्हटले आहे. नीति-संरक्षण आणि निसर्गाच्या कायद्यांची अंमलबजावणी ही त्याची कामे. याने सूर्य व नक्षत्रे यांना गती दिली आणि पृथ्वीचा विस्तार केला. सूर्याला मार्ग तयार करून दिला. आकाशातील पाणी नद्यांना दिले. तो सागराला मर्यादित करतो. पाणी निर्माण करणारा आणि संकटांतून तारणारा असे ऋग्वेदात वरुणाचे वर्णन केले आहे.

## २९ विदर्भाची पंढरी

अमरावती जिल्ह्यात वर्धा नदीच्या काठी कौंडिण्यपूर हे विठ्ठल-क्षेत्र आहे, त्याला 'विदर्भाची पंढरी' म्हणतात. रुक्मिणी व दमयंती यांचं हे माहेरगाव असून इथंच त्यांचं स्वयंवर झालं. वर्धा नदीच्या पात्रात लहानसं कुंड आहे, त्याला पुंडलिक कुंड म्हणतात. नदीच्या काठावरच विठ्ठलाचं देखणं मंदिर आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यात श्रीसदाराम महाराज, बैरागी महाराज व इतर काही संतांच्या समाध्या आहेत.

पांडुरंगानं दृष्टांत दिल्यावरून सदाराम महाराजांनी हे तीर्थक्षेत्र वसवलं. दृष्टांतानुसार त्यांना पांडुरंगाची एक धातूची मूर्ती मिळाली. तिचीच त्यांनी इथं स्थापना केली. वर मंदिरही उभारलं

ज्येष्ठ शु. प्रतिपदेस या क्षेत्रापासून रुक्मिणीची पालखी निघते ती पुढं आषाढी एकादशीस पंढरपूर इथं पोचते. त्यानंतर पालखी माघारी निघते, ती गोकुळअष्टमीस इथं परत येते.

रुक्मिणी तिच्या लग्नाच्या आदल्या दिवशी ज्या देवीच्या दर्शनाला गेली होती, ते गिरिजेचं मंदिर इथं गावाच्या बाहेर आहे.

प्राचीनकाळच्या कुंडिनपूर राजधानीच्या काही खुणा, जवळच भीमकाचं उद्यान आहे तिथं दिसतात.

इथं अलीकडेच केलेल्या उत्खननामुळंही हे नगर प्राचीन असल्याच सिद्ध झालं आहे.

---

## ३० राजा इन्द्र

इंद्र हा देवांचा राजा. युद्धाची आणि वादळाची व तुफानाची देवता. इन्द्र हा वृत्र जातीच्या राक्षसांचा संहार करणारा म्हणून त्याला 'वृत्रहन्' म्हणतात. 'ज्याने हलणाऱ्या पृथ्वीला नि पर्वतांना स्थिर केले, ज्याने विस्तीर्ण अंतरीक्षाची व्यवस्था लावली, द्यूला आधार दिला तो, इन्द्र होय.'

## ३१ विज्ञानगणेश

मराठवाड्यातील जालन्याच्या पश्चिमेकडे ३६ मैलांवर, गोदावरीच्या दक्षिण तीरावर राक्षसभुवन इथं गणेशाचं प्राचीन स्थान आहे. याला ' विज्ञानगणेश ' म्हणतात. याची कथा अशी आहे–

देवान्तक व नरान्तक या दोन दैत्यांचं पारिपत्य करण्यासाठी गजाननानं गणेश या नावानं इथं अवतार घेतला. दैत्यांना मारल्यावर श्रीदत्तात्रेयाला त्यानं याच ठिकाणी आपल्या पूर्ण स्वरूपात दर्शन दिलं. पत्नीच्या शापापासून आपली सुटका करून घेण्यासाठी सूर्यपुत्र शनी यानं गणेशाची उपासना केली तीही इथंच.

इथली सध्याची गणेशमूर्ती पूर्वी एका गुहेत होती. ती गुहेतून बाहेर काढण्याबद्दल, दोनेकशे वर्षांपूर्वी गणेशभक्त शंकरबुवा मंगलमूर्ती याला दृष्टांत झाला. तेव्हा त्यानं ती मूर्ती तिथून बाहेर काढली व ती उघड्या जागेत स्थापन केली. देवस्थानाची पूजाअर्चा त्याच्याच शिष्यपरंपरेने पुढं चालवली आहे.

गणेशानं श्रीदत्तात्रेयाला ज्येष्ठ शु. चतुर्थीला साक्षात् दर्शन दिलं, म्हणून त्याच तिथीला इथं गणेशजयंतीचा मुख्य उत्सव साजरा होतो.

या देवस्थानाला पेशव्यांनी काही उत्पन्न लावून दिलं होतं, असं सांगतात.

## ३२ मेघराज

पर्जन्य या देवतेचे मुख्य काम वनस्पतींची निर्मिती व संवर्धन करणे आणि पाऊस पाडणे. पर्जन्य याचा अर्थ 'पावसाचा ढग.' स्वर्गपुत्र व पृथ्वीचा पती असे त्याला म्हटलेले आहे. याच्यापाशी नेहमी पाण्याची गाडी असते. दुर्जनांचा नाश करणारा, निरपराध्यांना साहाय्य करणारा, औषधी वाढविणारा, सर्वांचे हित करणारा अशी पर्जन्याची स्तुती ऋग्वेदात केलेली आहे. ही वेदकालातील एक कनिष्ठ देवता आहे.

## ३३ बडा देव

गोंडांचा प्रमुख देव बडा म्हणजे मोठा देव म्हटला ज
याला 'परमपुरुष' मानतात; तर कुणी तो पहिला देव कि
असल्याचं मानतात. सूर्यदेव किंवा गृहदेव म्हणून मानण्या
आहे. गोंडांचा पहिला कुलपुरुष म्हणूनही कुणीकुणी त्याच
करतात.

हा देव भक्तांना पावतो, अशी गोंडांची श्रद्धा आहे. त
काही दंतकथा अशा—

एकदा या देवानं चवक वाळवीचं रूप घेतलं आणि गोंड
शत्रूचा किल्ला गुपचूप पोखरून टाकला. तर दुसऱ्या एकावेळ
पडलेल्या गोंड राजपुत्राला त्यानं, उंदराच्या साहाय्या न
र खणून निसटून जायला मदत केली.

गोंड लोक या देवाची रोज नेमानं पूजा करतात तं
गाऊन त्याला आळवतात. सार्वजनिक उत्सव कधी ३ वर्षांनी कधी
९ वर्षांनी होतो. त्यावेळी त्याचं प्रतीक म्हणून सागाची एका
झाडाखाली पुरतात. होमकुंडात तूप, तांदूळ, नारळ, फुलं अशा र्थांची
आहुती देतात. बोकडही बळी देतात. गावजेवणानंतर नृत्य
कार्यक्रम होतो. याचं दर्शन स्त्रियांना मात्र वर्ज्य असतं.

---

## ३४ हाटकेश्वर महादेव

नागर ब्राह्मणांचा हाटकेश्वर हा देव असून शंकराच्या तीन प्र
लिंगांपैकी हा एक मानतात. गुजरात-सौराष्ट्रात नागरी ब्राह्मणांची ब
वस्ती असल्यानं त्या भागात या देवाची मंदिरं ठिकठिकाणी
वडनगर हे नागर ब्राह्मणांचं मूळ स्थान असल्यानं तिथलं
मंदिर प्रमुख गणलं जातं.

वामनावतारात भगवंतानं आपल्या तीन पावलांत त्रैल लं
तेव्हा पहिलं पाऊल वडनगर इथं ठेवलं, असं

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ९०५५ दि. २८।२।९५
BVBK-0401755